
राजसत्तेचे अतिक्रमण रोखले पाहिजे

२८ सप्टेंबर १९६८
चाळीस पैसे

# माणूस



# सतरा ते सत्तेचाळीस...

"अजित आगाशेच्या पत्रात असे होते, की माझे नाव आर्टस्‌ला घातले आहे. मला आर्टस्‌ला मुळीच जावयाचे नाही. मी आता F. Y. BSc. ला तयार आहे. माझे कॅल्क्युलस झाले आहे. मी F. Y. BSc. फर्स्ट क्लास अगदी नक्की म्हणजे नक्कीच मिळवीन आणि इंजिनीयर होऊन मी एक Industrial Corporation उभे करणार आहे. तेव्हा मला इंजिनीयर व्हायचेच आहे......"

"पुण्याला परत आल्यावर एक 'संगीत-आस्वाद मंडळ' स्थापन करण्याचे माझे स्वप्न आहे. येथे मी पाहतो की बहुतेक सर्वांना संगीताबद्दल माहिती असते. शास्त्रीय संगीत, लोकसंगीत इत्यादी. पण आपले शास्त्रीय संगीत श्रेष्ठ दर्जाचे असूनही त्याचा समंजसपणे आस्वाद घेणारे श्रोते फारच थोडे असतात. असे जाणकार श्रोते– निदान ३०–४० तयार करण्याचे माझे स्वप्न आहे... मात्र हे श्रोते १५ ते २० वयातलेच असले पाहिजेत अशी माझी अट आहे !"

"येथील 'न्यूयॉर्क टाइम्स'मध्ये अशी बातमी आहे– "Mrs. Indira Gandhi was determined to Nationalise banks but Morarji warned her that if she did so, he would quit." यावरून मोरारजी सरकारात आहेत हे किती चांगले आहे हे सिद्ध होते. राष्ट्रीयकरण करणे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विनाशाचा पाया खोदणे आहे..."

असे अनेक विचार, अनेक योजना, अनेक स्वप्ने सतरा-अठरा वर्षांचा एक तरुण आपल्या उराशी बाळगून मायदेशी परतत आहे....

कोवळ्या वयातील एक वर्षाच्या अमेरिकेतील वास्तव्यामुळे त्याच्या कक्षा खूप विस्तारल्या आहेत, त्याच्या व्यक्तित्वात काही बदल ओघानेच घडून आलेले आहेत....

[ कव्हर ३ वर ]

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : अठरावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **सप्टेंबर, १६**

'पुरात वाहून गेलेली बस' वाचून मन हेलावलं. या अपघाताची बातमी फक्त आमच्या वाचण्यात होती. पण हा अपघात किती भीषण होता याची आता कल्पना आली. दैनंदिन जीवनात असे अपघात नेहमीच घडतात. संबंधित व्यक्तींनी असे प्रसंग शब्दबद्ध करावयास हवेत. मराठीत अशा प्रकारचं लेखन फार कमी आहे. श्री. गजानन केशव साठे यांचं खास अभिनंदन. एखाद्या सरा-ईत लेखकाला लाजवील इतकं जिवंत चित्रण त्यांनी केलं आहे. आपलही खास अभिनंदन. 'माणूस'चा दर्जा टिकविण्यात अद्याप तरी आपण यशस्वी आहात. 'रातराणी' हे माझं विशेष आवडतं सदर. इतरही सदरे कमी-अधिक प्रमाणात आवडतात.

**रा. रं. बोराडे**, परभणी

**स. न.** **सप्टेंबर, १७**

१४ सप्टेंबर १९६८ च्या 'माणूस'मधील 'पुरात वाहून गेलेली बस' हा श्री. साठे ह्यांनी लिहिलेला लेख वाचून अपघाताबद्दल सविस्तर माहिती समजली.

ह्या लेखात एक क्षुल्लक चूक झाली आहे. पूर्णेच्या एका बाजूला असलेल्या एका गावाचे नाव टापरखेडा असे नसून टाकरखेडा असे आहे.

**रा. के. देव**, भंडारा

**मूल्य ४० पैसे**
**४१९ नारायण**
**पुणे २**
**दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# सहानुभूति

श्री. एस्. एम्. जोशी यांनी दिनांक १८ सप्टेंबरपासून सुरू केलेल्या उपोषणा-मागील भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

जर हे उपोषण दि. १९ सप्टेंबरचा सरकारी नोकरांचा संप चिरडण्यासाठी शासनाने केलेल्या बेसुमार दडपशाहीचा निषेध असेल तर सर्व थरातून, सर्व वर्गातून या उपोषणाला सहानुभूती लाभणे अवश्य आहे.

दडपशाही जरी आजवर अनेकदा झालेली असली तरी यावेळचा मामला गंभीर होता. सरकारी नोकरांच्या मागण्या योग्य की अयोग्य, हा वादाचा प्रश्न होऊ शकेल. पण या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी सरकारी नोकरांनी पुकारलेला एक दिवसाचा लाक्षणिक संप वटहुकूम काढून दडपून काढणे हे लोकशाहीला न शोभणारे कृत्य आहे. या वटहुकुमाची व्याप्तीही या वेळी लोकशाहीच्या भवितव्या-बाबत काळजी उत्पन्न करायला लावणारी आहे. संपात सहभागी होणाऱ्या कर्म-चाऱ्यांवरच नाही तर या संपाला प्रकट, अप्रकट पाठिंबा व्यक्त करणाऱ्या सर्व-सामान्य नागरिकांवरही या वटहुकूमामुळे गदा आलेली आहे. हा नागरिक स्वातं-त्र्याचा उघडउघड भंग होय. सर्व लोकशाहीप्रेमी जनतेने याचा तीव्र निषेध करणे व हा दुष्ट पायंडा वेळीच रोखून धरणे अगत्याचे आहे.

निग्रह आणि अनुग्रह यावर राज्ये चालतात. यांचा अतिरेक झाला तर ती कोसळतात. आपल्याकडे सध्या या दोन्ही मार्गांचा अतिरेक सुरू आहे. समाजातील फार मोठा सुशिक्षित–अशिक्षित वर्ग सरकारी अनुग्रहामुळे मिंधा बनलेला आहे; दुसरीकडे जनसामान्यांच्या प्रामाणिक भावनांची कदर न करण्याची, न्याय्य हक्कांची पायमल्ली करण्याची, बेसुमार सत्ता हाती घेण्याची शासनाची प्रवृत्तीही वाढत आहे. कच्छ प्रकरणी महाराष्ट्रातील जनतेने संयमाने आपल्या भावना व्यक्त केल्या. पण सातारा–सोलापूर येथे मात्र कारण नसताना निदर्शकांना बेदम झोडप-ण्यात आले. नागपूर–औरंगाबादला तेच, अमरावतीचा अनुभवही काही वेगळा नाही. या बेफाम अत्याचारांची साधी चौकशीची मागणीही सरकारला पसंत नाही. यामुळे भय, लाचारी आणि वैफल्य यांचा सर्वत्र बुजबुजाट वाढत आहे. लोक-शाहीचा नंदादीप अशा वातावरणात एक दिवस केव्हा विझून जाईल ते आपल्याला कळणारही नाही. निर्भय, निरपेक्ष आणि स्वतंत्र लोकमत हा लोकशाहीचा प्राण-वायू आहे. घटना, निवडणुका हा केवळ सांगाडा आहे. हा सांगाडा वरवर कायम

ठेवूनही हुकुमशाही हळूहळू आपली पकड कायम करू शकते असा अनेक देशातील अनुभव आहे. आपल्याकडे या अनुभवाची पुनरावृत्ती व्हायला नको असेल तर लोकमताच्या प्रवक्त्यांनी वेळोवेळी राजसत्तेच्या अतिक्रमणाची जागरूकपणे दखल घेतली पाहिजे. आपापल्या माध्यमातून या अतिक्रमणाचा निषेध–प्रतिकारही केला पाहिजे. मग ते अतिक्रमण निग्रहाचे असो वा अनुग्रहाचे.

वटहुकूमाचा बडगा उगारला गेला तरी दि. १९ चा संप तुलनेने पुष्कळच यशस्वी ठरला. जर संपनेत्यांनी लोकमत अनुकूल करून घेण्यासाठी काही प्रयत्न केले असते तर यशाचे प्रमाण आणखी वाढले असते, सरकारी कर्मचारी काम करीत नाहीत, या क्षेत्रात खाबुगिरी फार माजली आहे ? नोकरशाहीचा हा अनुत्पादक घटक विनाकारण फुगला आहे, असा सर्वसाधारण समज आहे. त्यामुळे समाजाकडून उत्स्फूर्त सहकार्याची वा सहानुभूतीची अपेक्षा बाळगणे थोडे धाडसाचेच होते. काही आकडेवारी, प्रचार यामुळे ही लंगडी बाजू सावरून धरता आली असती, पण तसे प्रयत्न झाले नाहीत. यापुढच्या हुकुमशाहीच्या व अतिरिक्त केंद्रीकरणाच्या काळात अशा व्यापक सहानुभूतीशिवाय कोठलेही जनआंदोलन यशस्वी होणार नाही याची खूणगाठ कार्यकर्त्यांनी या अनुभवावरून तरी मनाशी बांधली पाहिजे.

कोठल्याही आंदोलनात फाटाफूट गृहीत धरावी लागते. पण योग्य तयारीने याचे प्रमाण बरेच कमी करणेही शक्य असते. वटहुकूम निघणार, दडपशाही होणार याची पूर्वकल्पना निदान संपनेत्यांना तरी असावी. संपात सहभागी होणाऱ्यांची मानसिक तयारी या दृष्टीने पूर्ण झाली होती का ? तसे दिसत नाही. वटहुकूम निघाल्यावर धडाधड एकापाठोपाठ एक संघटना बाहेर पडतात याचा उलगडा एरव्ही होत नाही. परस्परांचे खालपासूनचे निकट संबंध, लहानलहान सभा–बैठकी, व्यापक लोकमताची उभारणी, अभ्यासपूर्ण प्रचार यातूनही मानसिक तयारी होत असते. केवळ असंतोष भडकवून संप वा इतर आंदोलने यशस्वी करण्याचे दिवस संपले. बलाढ्य सत्तेशी झुंज घ्यायची आहे – तयारीही तशीच भक्कम हवी; एकही फट, एकही कच्चा दुवा राहता कामा नये ही दक्षता संघटकांनी घेणे अवश्य आहे. लोकांच्या जिवाशी, रोजच्या भाकरीशी संबंध असतो म्हणून तर दक्षतेची अधिकच गरज.

संपनेत्यांमधील फाटाफूट ही तर अशा वेळी अक्षम्य समजली पाहिजे. एस. एम. पुढे सरसावले म्हणजे डांग्यांनी अंग काढून घ्यायचे हा काय चावटपणा आहे ? यामुळे लोकांचा विश्वासघात होतो. अनेक संघटना आणि नेत्यांमधील बेबनाव यामुळे आपल्या मजूर चळवळीची फार हानी होत आहे.

**दि. २१ सप्टेंबर** **श्री. ग. मा.**

श्री. नां.ची 'संभूसांची चाळ' आणि हे नाटक यात तसे उजवे डावे करता येणार नाही. तरीही ती चाळ जशी लोकप्रिय झाली तशी या नाटकातली 'बळी-भद्राची चाळ'ही होईल, कोणी सांगावे ?

रा त रा णी । रा त रा णी

वि ज य । तें डु ल क र

# असं झालं आणि उजाडलं

नाटक हे मध्यमवर्गीय पांढरपेशाच्या जिवावर जगणारे रंजनमाध्यम आहे हे ओळखून या प्रेक्षकाला आवडेल, रुचेल, पचेल असे पक्वान्न 'शिजवून' ज्यांनी ज्यांनी ते रंगमंचावर 'वाढले' त्यांना या प्रेक्षकाने सहसा दगा दिलेला नाही. कुटुंबजीवन हे या प्रेक्षकाचे एक मर्मस्थान आहे. विनोदाने वा कारुण्या-साठी, कसाही, पण रंजकतेच्या मर्यादेत या मर्मस्थानाला ज्यांनी शिताफीने आणि अचूकपणे हात घातला त्यांना त्यांच्या वकूबानुसार या प्रेक्षकाने आपले स्व-कष्टार्जित अल्पस्वल्प धन, इतर खर्चात प्रसंगी काटछाट करूनदेखील, सातत्याने वाटले आहे.

पु. ल. देशपांडे हे या प्रेक्षकाचे रंजनाचे हक्काचे आणि श्रेष्ठ स्थान. या प्रेक्षकाला न दुखावता, अस्वस्थ न



**श्रीकांत मोघे । सौ. ललिता केंकरे**

[ छाया : अरुण राजदत्त ]

करता, त्याच्या भावुकतेला योग्य ठिकाणी हुकमी आवाहन करीत खदखदा हसवण्याचे आणि रिझवण्याचे कसब पु. ल. ना साधले तसे अन्य कुणालाही साधलेले नाही. मो. ग. रांगणेकर यांनीही काही काळ यशस्वीपणे या प्रेक्षकाला आपल्या मुठीत ठेवले होते. बाळ कोल्हटकर, वसंत कानेटकर ही आणखी नावे. कानेटकरांच्या शिवाजी-संभाजीत इतिहास विसरून या प्रेक्षकाने स्वतःचे कुटुंबजीवनच उत्स्फूर्त गहिवरांनी वारंवार भरत पाहिले. या पंक्तीत नव्याने दाखल झालेले नाव श्री. ना. पेंडसे यांचे.

पेंडसे हे तसे साहित्यिक म्हणून केवळच रंजन-कार नव्हेत. त्यांच्या ' रथचक्र ', ' लव्हाळी ' सारख्या कादंबऱ्यात प्रसंगी अस्वस्थ करून सोडणारा जीवनाचा अस्सल आणि उघडावाघडा भेदक प्रत्यय आहे. पांढरपेशा वाचकाला याने क्वचित न पेलणारा एखादा धक्काही दिला आहे. पेंडशांचे ' राजेमास्तर ' (नाव बदलून ' अखेरचे राजे ' म्हणून हे पुनश्च रंगभूमीवर आणण्यात येत आहे) सारखे एखादे नाटक पांढरपेशा प्रेक्षकाला न रुचल्याने असफल झाले, असेही दाखवता येईल. किंबहुना ' गारंबीचा बापू ' हे याच नावाच्या लोकप्रिय कादंबरीवर रचलेले पेंडशांचे यशस्वी नाटक प्रयोगांचे शेकडे ओलांडूनही पेंडशांच्या साहित्यिक पिंडाला सर्वस्वी सोडून आहे असे म्हणता येणार नाही. त्याच्या यशाची कारणे वेगळी आहेत. परंतु ' संभूसांची चाळ ' लिहून मात्र पेंडशांनी नाटककार म्हणून आपली भूमिका आपल्या इतर साहित्यनिर्मितीहून वेगळी आणि पक्की केल्यासारखे वाटले. मुंबईतल्या चाळ-

संस्कृतीला त्यांनी हात घातला आणि या संस्कृतीलाच रिझवील असे, दैनंदिन वास्तवाचे खुसखुशीत आणि विलोभनीय दर्शन घडवू बघणारे एक रंजक नाटक लिहिले. वस्तुतः याच विषयावर याच प्रकारचे यशस्वी लेखन पु. ल. देशपांडे यांनी केले होते आणि रंगभूमीवरच ते उदंड लोकप्रियदेखील करून दाखवले होते. असे असता पेंडशांच्या ताकदीचा परिपक्व लेखक पुनश्च त्याच मळल्या वाटेने तशीच पावले टाकतो तो काही गैरसावधपणे नव्हे. ही मळवाट पेंडशांनी अगदी टोकापर्यंत तुडवली आणि 'बटाटयाची चाळ' चेच अखेरचे चाळ आणि ब्लॉकसंस्कृतीचे भावविवश विवेचन थोड्याबहुत शाब्दिक तफावतीने गिरविणारी अखेर आपल्या 'चाळी'ला दिली. पेंडशांचे हे हिशेबी धोरण–ते हिशेबीच असल्यास–सफलही झाले आणि आपल्या प्रयोग-मूल्यांमुळे सरकारी स्पर्धेत बक्षिसार्ह ठरलेली 'संभूसांची चाळ' व्यवसायाच्या खुल्या स्पर्धेत एकाही ख्यातनाम नटनटीच्या चलनी नाण्याविना भरपूर यशस्वी ठरली. तिचा शंभरावा प्रयोग नुक्ताच मुंबईत रवींद्र नाटयगृहात थाटाने साजरा झाला आणि दर्दी व्यावसायिकांनाही आपल्या आडाख्यांबाहेरच्या या घवघवीत यशाचे तोंडभर कौतुक करावे लागले.

## श्री. ना. ची नवी भूमिका

पेंडशांनी नाटककार म्हणून पत्करलेली ही नवी, 'पांढरपेशांचा यशस्वी रंजनकार' ही भूमिका 'संभूसांची चाळ'च्या शंभराव्या प्रयोगानंतर पाठोपाठच 'रंगधारा' याच संस्थेने रंगभूमीवर आणलेल्या त्यांच्या 'असं झालं आणि उजाडलं' या नव्याकोऱ्या नाटकाने आणखीच स्पष्ट केली आहे. वस्तुतः हे नाटक तसे 'नवे' नव्हे. 'लव्हाळी' या पेंडसे यांच्या अलिकडील कादंबरीचा आधार त्याला आहे. 'लव्हाळी'चा विषय पांढरपेशा चाळ-संस्कृतीच आहे. या संस्कृतीच्या मर्यादा आणि बळ या कादंबरीत फार समर्थपणे, एका पांढरपेशा संवेदनाक्षम माणसाच्या रोजनिशीद्वारे पेंडश्यांनी उभे केले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा या वर्गाच्या संकुचित जीवनाचा आलेखच जणू, मोठमोठ्या जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या कादंबरीत काढलेला आहे आणि तो बव्हंशी मनोज्ञ आहे, अस्वस्थ करून सोडणाराही आहे. या शाब्दिक आलेखाला रंगमंचावरचे दृश्य आणि स-जीव रूप देताना त्यात लहानमोठे बदल होणे आपरिहार्यच होते. किंबहुना या आलेखामागचा पांढरपेशा जीवनाच्या आत्मनिरीक्षणाचा मूळ हेतू कायम ठेवून बाकी सर्व बदलते तरीही ते कदाचित आवश्यक ठरले असते. 'असं झालं आणि उजाडलं'मध्ये मात्र मूळ हेतूच पुष्कळ अंशी बदलला असून नाटकाला जड वा अनावश्यक असा कादंबरीतील बराच तपशील कायम ठेवण्यात आलेला, शिवाजीमंदिरात झालेल्या या नाटकाच्या पहिल्या प्रयोगात दिसला.

उदाहरणार्थ पात्रांची भाऊ गर्दी. सांगोवांगीचे अनेक प्रसंग. प्रसंगांची पुनरावृत्ती. जुन्या राजकीय घटनांच्या उजळण्या आणि त्यावरचे निरर्थक वादंग आणि चर्चा.

कालखंडाची दीर्घ व विस्कळीत लांबण. याउलट एकूण नाटकाचा परिणाम कादंबरीहून वेगळा म्हणजे एकाद्या विनोदी नाटकाचा झाला. कादंबरीत सूत्ररूप अशी संवेदनाक्षम मनाची अंतर्मुख चिंतनिका नाटकात देखण्या नायकाचे चटपटीत, खुसखुशीत, नाटकी निवेदन झाली आणि कादंबरीतला नायकाचा अंगभूत माफक भावविवशपणा नाटकात शाब्दिक विनोदांच्या भुसनळ्यांच्या अधला मधला 'रिलीफ' किंवा रुचिपालट ठरला. परिणामी कादंबरीचे बळ नाटकाने टाकले आणि नाटकाचे म्हणून जे बळ त्याला मिळावे ते कादंबरीतून पदोपदी घेतलेल्या तपशिलाच्या आणि पात्रांच्या गर्दीपायी नीटसे मिळाले नाही. तरीही कादंबरीहून अगदी वेगळी अशी नाटकाची दिशा स्पष्ट होती: पांढरपेशा वर्गाचे 'संभूसांची चाळ'-च्याच वळणाने आणखी रंजन. पहिल्या प्रयोगात हे अधूनमधून उत्तम प्रकारे झाले तसे अधूनमधून झाले नाहीही. कादंबरीत वरवर विस्कळीत वाटणारा सारा तपशील काळजीपूर्वक जोडत जाणारे बंदिस्त तंत्रकौशल्य नाटकात—विशेषत: त्याच्या रचनेच्या अंगात—अभावाने भासले. प्रत्येक तपशीलाला, प्रसंगाला, शाब्दिक विनोदाला, शिवीला तात्पुरता परिणाम होता, परंतु या साऱ्याचे मिळून एक बांधेसूद रंगतदार आटोपशीर नाटक घडत नव्हते. यामुळे उत्तरोत्तर हाच रंजक मालमसाला अतिरंजित वाटत गेला आणि नायक सर्वोत्तम सटकरचे पु. ल. देशपांडे यांच्या एकपात्री कार्यक्रमाची अखेर सुचविणारे प्रेक्षकांशी अखेरचे भावपूर्ण, समारोपपर, मुक्त हितगुज व्याख्यानबाजीसारखे ठरले. प्रेक्षकांनी ते तसेच कुरकुरत घेतले.

## दिग्दर्शनातील उणीवा

दिग्दर्शनातदेखील या प्रकारच्या संवादप्रधान, कथानकरहित, बहुपात्री नाटकाच्या मर्यादेची जाणीव प्रतीत झाली नाही. एकतर पहिला प्रयोग सव्वाचार तास चालला. नाटकाचे स्वरूप पाहता तो निदान तासाने कमी असणे जरूर होते. प्रत्येक प्रसंगाची रंगमंचावरची उभारणी सैल आणि वहावती वाटत होती. अभिनयातला चटपटीतपणा पुनरुक्त्या आणि दीर्घसूत्री लेखन यामुळे, निष्प्रभ ठरत होता. काही पात्रे (उदा० सरस्वतीबाई बोडस, भाऊ बिवलकर) चटपटीत अभिनयाऐवजी कजाग, आक्रस्ताळा आणि वटवटीत, ठरीव ठशाचा अभिनय करून प्रसंगांची गती अडवीत होती. तीनही वयस्क चाळकर (रमाकांत देशपांडे, एलिस रामराजकर, विठ्ठल पणदूरकर) एकाच साच्यातले वाटत होते. चाळीतल्या बायांच्या चकाट्यांसारख्या किंवा चाळकरांच्या भांडणांसारख्या प्रसंगांनी, या आधीच लांब नाटकाची लांबी आणखीच वाढली असे वाटले. अखेरच्या प्रकट आत्मगतात पाळण्यातले भावले आरंभी मूल म्हणून दर्शवून अखेर ते भावलेच आहे असे प्रेक्षकांना दिसणार हे गृहीत धरून केलेली युक्ती (मंडळी, हे भावलंच आहे ना! आमचा अर्चिस त्याच्या आईबरोबर बाहेर गेला आहे—) चतुराईची ठरली, परंतु तिने त्या शैलीदार आत्मगतातला अस्सलपणा काढून घेतला आणि ते मनस्वी नाटकी करून

टाकले. हे दिग्दर्शन दामू केंकरे यांचे होते असे काही चमकदार, विनोदप्रचुर युक्त्या आणि श्रेयनामावलीवरूनच म्हणता आले असते; एरवी अनुभवी आणि समर्थ दिग्दर्शनाचा एकसंध स्पर्श या नाटकात भासलाच नाही.

अभिनयात श्रीकांत मोघे यांनी नायक सर्वोत्तम सटकर म्हणून आपल्या हातखंडा उमद्या, खेळकर आणि हरहुन्नरी गुळगुळीत अभिनयाचे प्रसन्न दर्शन घडवले. नंतर नजरेत भरले सर्वोत्तमाच्या धाकट्या ट्रक ड्रायव्हर भावाच्या भूमिकेतले रमेश रणदिवे, सर्व्यांच्या तीर्थरूपांच्या निःशब्द भूमिकेतले टी. एस. साटम, ('संभूसांची चाळ'चे दिग्दर्शक) सौ. मंगीच्या भूमिकेतल्या सौ. ललिता केंकरे आणि स. स. च्या दोन परस्परविरुद्ध वृत्तीच्या दोस्तांच्या भूमिकेतले मोहन दळी आणि सुंदर तळाशिलकर. तरीही हे नाटक राहिले दोनच व्यक्तिरेखांचे– एक अती बडबड्या खुद्द सर्वोत्तम आणि दुसरे त्याचे एकही शब्द न उच्चारता नाटकभर केवळ दिसणारे, विड्या फुंकणारे आणि मधून मधून रडणारे तीर्थरूप. बाकी सारी बव्हंशी एखाद्या विविधगुण दर्शन कार्यक्रमातली चित्रविचित्र गर्दी म्हणूनच लक्षात राहिली.

नेपथ्यातही तसे काही विशेष नव्हते. याहून 'संभूसांची चाळ'चे नेपथ्य त्या नाटकाला प्रत्यक्षपणे उपयुक्त आणि कितीतरी कल्पक वाटले होते.

हे सर्व असूनही प्रौढ पांढरपेशा प्रेक्षकाच्या स्मृती जागविणारा १९४० पासूनच्या या जीवनाचा जंत्रीवजा का होईना पण आलेख, आजच्या तरुण प्रेक्षकाला खदखदा हसवील असा नाटकभर पेरलेला धीट आणि वाह्यात विनोद, आणि दैनंदिन कुटुंब जीवनातल्या गमतीजमतींचे गृहिणी वर्गाला गुदगुल्या करणारे चित्रण आणि उल्लेख यांनी हे नाटक बरीच काटछाट केल्यास– पांढरपेशा प्रेक्षकाला रुचेल अशी भरपूर शक्यता आहे. एकूण रचनेत 'संभूसांची चाळ' आणि हे नाटक यात तसे उजवे डावे करता येणार नाही तरीही ती चाळ खूप लोकप्रिय झाली; तशी या नाटकातली 'बळी भद्राची चाळ' ही होईल; कोणी सांगावे ?

'रथचक्र', 'लव्हाळी' कर्त्या कादंबरीकार श्री. ना. पेंडशांवर लोभ करणारांनी फार तर हे नाटककार आणि रंजन-कार पेंडसे निराळे मानावेत, म्हणजे झाले.

निदान पेंडश्यांनी तरी असे मानले आहे खास. आणखी काही वर्षात कोल्हटकर आणि कालेलकरांबरोबरीने त्यांच्याही नाटकांनी तडाकेबंद धंदा केलेला दिसला तर नवल मानण्याचे कारण उरलेले नाही.


O

पुण्यांत चतुःश्रृंगीच्या परिसरांत गणेशखिंड रोडजवळ गोखले मार्गावर ओनरशिप फ्लॅट्सची उत्तम सोय

# कमलबाग योजना

एकंदर ४ इमारतींपैकी दोन तयार इमारतीतील फ्लॅट्स विकले गेले आहेत. ★ १२ फ्लॅट्स व ८ कारपोर्ट्सच्या तिसऱ्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. ★ त्यांत आपला फ्लॅट आजच रिझर्व्ह करा. ★ सुखसोयींना बाध न आणतां काटकसर ★ २ बेडरूम्स, स्वयंपाकघर-जेवणघर, बैठकीची खोली, २ संडास, १ बाथरूम, बाल्कनी, लॉबी, पोटमाळा यांनी युक्त ★ ८४५ स्क्वे. फूट कार्पेट एरिया ★ फक्त ३० नोव्हेंबर ६८ पर्यंत ग्राहक होणारांसच पुढील सवलतीची किंमत.

फ्लॅट् रु. ३५२५० ते रु. ३६५०० ● कारपोर्ट रु. २००० ते ३०००




**के. व्ही. एंटरप्राईज**, कमलबाग, गोखले रोड, पुणें १६. टेले.: ५४०१०

दिल्ली चौकशी :- सौ. प्रमा ठकार, बी-७ ग्रीन पार्क एक्स. नवी दिल्ली १६.

# ग्रंथ सान्निध्याची प्रेरकता

प्रा. ग. वि. अकोलकर नाशिक

पूर्वीच्या काळी जमिनीत द्रव्याचे हंडे पुरून ठेवीत असे म्हणतात. सर्व विश्वाची शोभा-कांती समजल्या जाणाऱ्या लक्ष्मीला हे अंधारातले जीवन कसे मानवत असेल कोण जाणे ! पण ही पाळी लक्ष्मीवरच येते असे नाही. ज्ञानाची दिव्यदृष्टी देणाऱ्या सरस्वतीवरही ही पाळी येते–कधी पालनकर्त्याच्या अज्ञानामुळे तर कधी सांभाळण्याच्या चिंतेने. आमच्या घरी तीच स्थिती झाली होती; आमच्या घरात 'एक लाकडी कपाट होते. पुस्तकांनी खच्चून भरलेले ! वडिलांना ही ग्रंथसंपदा म्हणजे अमोल ठेवा वाटे. त्यांना शिक्षणाची पुरेशी संधी मिळाली नव्हती. वडील व आजोबा त्यांच्या अल्पवयातच निवर्तले होते. तरीही मॅट्रिकपर्यंत शिक्षण (इ. स. १८९६) त्यांनी घेतले होते. वडिलांची व आजोबांची ही ग्रंथसंपत्ती त्यांनी जीवापाड जतन केली होती. मुलांनी तिचा भरपूर उपयोग करावा ही प्रबळ इच्छा होती. रात्री कामधाम आटपले की हे कपाट ते उघडीत. आम्ही जवळ असू. एकेक पुस्तक काढून दाखवीत. त्यावरील नावगाव सांगत. काही पुस्तके आमच्या पंजोबांनी घेतलेली होती. 'रामचंद्र मैराळ दप्तरदार' अशा छापील चिठ्ठ्या अनेकांवर डकवलेल्या असत. काही आमच्या आजोबांची. त्यावर इंग्रजीत जुन्या चौथ्या लिपीत अतिशय रेखीव अक्षरात 'महादेव रामचंद्र निगोजकर' हे नाव लिहिलेले आहे. विशेष गोष्ट म्हणजे हायस्कूलमध्ये इंग्रजी, संस्कृत व गणित विषयात प्रावीण्य मिळाल्याबद्दल पारितोषिक म्हणून मिळालेले कितीतरी ग्रंथ त्यात होते. वडील मोठ्या अभिमानाने ती लेबले वाचून दाखवीत. आम्ही अशी पारितोषिके मिळवावी ही त्यांची आकांक्षा असल्यास न कळे !

या संग्रहात कोणती पुस्तके होती ? असे विचारण्यापेक्षा कोणती नव्हती, हेच विचारणे बरे. त्यात ग्रीस, रोम व इंग्लंडचे इतिहास होते. केवळ दुर्बिणीखाली वाचायला हवीत अशी एक बायबलची प्रत होती आणि समग्र शेक्स्पीअर होता. मिल्टनचे पॅरेडाइज लॉस्ट, पोपची समग्र कविता, गोल्ड्स्मिथचे 'डेझर्टेड व्हिलेज' व स्कॉटच्या काही कादंबऱ्या होत्या आणि कायद्याची काही जाडीजुडी पुस्तके होती. संस्कृत साहित्याचा ठेवा तर बहुमोलच होता. बंगाली देवनागरी लिपीतले रघु-

वंशाचे सटीक खंड, बाजाची कादंबरी, दंडीचे दशकुमार चरित, भट्टीकाव्य, पार्वती परिचय, नागानंद-मृच्छकटीक इत्यादी नाटके, शाकुंतल नाटक व भारतचम्पू पोथीस्वरूपात छापलेले. मॅक्सम्युलर, किलहॉर्न प्रभृतींची इंग्रजीतील व्याकरणाची पुस्तके होती. तसे म्हटले तर तो ( १८६० ते ८५ ) मराठीच्या भरभराटीचा काळ नव्हता. पण मराठी पुस्तकांना आश्रय देण्याचे पणजोबांना व्यसन असावे असे दिसते. कारण या कपाटात नवनीत व तुकारामाच्या गाथेबरोबर कोलंबसाचा प्रवास, गॅलिव्हरचा प्रवास ही पुस्तकेही होती. थोरल्या शास्त्रीबोवांचे काही ग्रंथ होते, विष्णुशास्त्र्यांची संपूर्ण निबंधमाला होती. तसेच, महाभारतातील शान्तिपर्वाच्या मराठी अनुवाद होता. शंभर वर्षापूर्वी असा ग्रंथ-संग्रह करणारी पिता-पुत्रांची जोडी जबरदस्त विद्या-प्रेमी असली पाहिजे व त्या काळच्या मानाने बरीच आघाडीवर होती असे वाटू लागते. आमच्या घराण्याची खरी संपत्ती हीच वडिलांनी काळजी-पूर्वक सांभाळली. आमच्या हवाली केली. त्यातील काही काळाच्या भक्ष्यस्थानी पडली ( अनेक कारणांनी ) पण बरीचशी आजही माझ्या अभ्यासिकेच्या कोपऱ्यात सुखरूप आहे.

## ज्ञान-लालसा प्रज्वलीत केली

या कपाटातील पुस्तके आपल्याला वाचायला मिळाली पाहिजेत, ही लालसा मनात हळूहळू निर्माण झाली. ही पुस्तकांची दुनिया काही अलौकिक आहे, असे वडील जे वाचून दाखवीत, त्यावरून वाटे. त्या वेळच्या सर्व भावना आज आठवत नाहीत ( या गोष्टी १९१५ ते २० या काळातल्या आहेत ) पण या ग्रंथांबद्दल आदर व भक्ती नक्कीच मनात निर्माण होऊ लागली होती. वडीलांनी कुतूहलाचे बीज पेरले होते. केतकर टाऊन हॉलमधील वाचनालयात वाचावयाची गोडी लागल्यावर स्वाभाविकपणेच लक्ष या घरच्या लक्ष्मी-सरस्वतीकडे वेधले. पुस्तकाची कदर करण्या-इतकी आवड म्हणा, आस्था म्हणा, जबाबदारी म्हणा आमच्यात निर्माण झालेली पाहून वडिलांनी कपाटाची किल्ली आमच्या हवाली केली. सुटीच्या दिवशी पुस्तके चाळावी, मनाला येईल ते मराठी पुस्तक घेऊन वाचावे, असा क्रम सुरू झाला. त्यातील इंग्रजी व संस्कृत पुस्तकांचा उपयोग ९ वी व १० वीत गेल्यापासून व महाविद्यालयीन शिक्षण करताना झाला.

हे पुस्तकांचे सान्निध्य प्रेरक ठरले यात शंका नाही. आपल्या आजोबांइतके आपण शिकले पाहिजे, ही तर प्रेरणा मिळालीच पण वाचनाची, ज्ञानाची गोडी लागली. ग्रंथ हे मित्र, सद्‌गुरू यांचा अनुभव आला. वाचन हा निरतिशय आनंदाचा झरा हे कळले. मला वाटते सर्वांचा अनुभव असाच असावा. पुस्तके वातावरण निर्माण करतात. बगीच्यात मुलांना नेऊन सोडण्याचे जे महत्त्व आहे, तेच समृद्ध ग्रंथालयात मुलांना नेऊन सोडण्याचे आहे. शाळेतल्या ग्रंथालयाशिवाय दुसरे कोण हे कार्य करणार ? ○

## ग्यानबाचे गुऱ्हाळ

### □ चातुर्वर्ण्य

जे. पी. नाईक तुम्हाला ठाऊक आहेत ना! देशातले ते एक थोर शिक्षणतज्ज्ञ आहेत. परवा एके ठिकाणी भाषण करताना शिक्षकांच्या सध्याच्या स्थितीबद्दल त्यांनी फारच मार्मिक विचार मांडले. ते म्हणाले, "आपल्या शिक्षकातही सध्या चातुर्वर्ण्य माजलेले आहे. विद्यापीठाचे शिक्षक हे ब्राह्मण. महाविद्यालयातले शिक्षक क्षत्रीय वर्णाचे आहेत. माध्यमिक शाळातील शिक्षक हे वैश्य तर प्राथमिक शिक्षक हे शूद्र—अशी व्यवस्था सध्या दिसते. शिक्षण क्षेत्रातले हे चातुर्वर्ण्य फार विषम आणि भयंकर आहे. ते लवकरात लवकर नष्ट केले पाहिजे."

नाईकसाहेबांचे हे विचार मार्मिक नाहीत असे कोण म्हणेल? विद्यापीठातले शिक्षक सध्या खरोखरीच श्रेष्ठ वर्णाचे आहेत. ब्राह्मण आहेत. 'ब्राह्मणु हिंडता बरा' या उक्तीस अनुसरून ही मंडळी सदैव हिंडत असतात. कधी ते कॉन्फरन्सला म्हणून बाहेर पडतात. कधी परीक्षक म्हणून हिंडत असतात तर कधी आपल्या विषयाचे अधिकारी म्हणून ते निरनिराळ्या विद्यापीठांच्या सभांना सल्ला देण्यासाठी म्हणून फिरतात. एरवीच्या वेळात व्याख्याने, सभासंमेलने इ. साठी प्रवास होतो तो निराळाच. ब्राह्मणाचे दुसरे लक्षण म्हणजे विद्वत्तेचा, ज्ञानाचा आव आणणे, लोकांना न कळणाऱ्या गीर्वाण भाषेत बडबड करणे आणि दक्षिणेसाठी हात पसरणे. हीही लक्षणे आमच्या शिक्षणक्षेत्रातल्या ब्राह्मण वर्गात बरोबर आढळतात. आमची विद्यापीठातली प्राध्यापक मंडळीही—काही सान्मान्य अपवाद सोडून—विद्वत्तेचा आव आणीत असतात. लोकांना, विद्यार्थ्यांना आपले बोलणे कळू नये याची बरोबर दक्षता घेतात. दक्षिणा हा तर सर्वांचाच प्रेमाचा विषय. पण ब्राह्मणांचा अधिकार त्यात जसा श्रेष्ठ, तसा यांचाही. मुख्य म्हणजे इतरांना तुच्छ आणि आपल्यापेक्षा कनिष्ठ लेखणे हा ब्राह्मण वर्णाचा गुण याही वर्णात अधून मधून आढळतो. या सगळ्या दृष्टींनी या वर्गाला 'ब्राह्मण' ही पदवी कशी शोभून दिसते नाही का?

क्षत्रीय वर्णाचा गुण केवळ शुद्ध पराक्रम करण्याचा. बुद्धीकडे दुर्लक्ष करण्याचा. महाविद्यालयातील शिक्षकांचे हे वैशिष्टय कोण नाकारील? ही शिक्षक मंडळी व्यासंगापासून कटाक्षाने दूर राहतात ती याच कारणामुळे. आपसात सतत मारामाऱ्या करून ते आपले क्षत्रीयपण सदैव सिद्ध करीत असतात. भर कॉमनरूममध्ये एकमेकांच्या उरावर बसणे, मुलांच्यादेखत एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणे, परीक्षेच्या स्वारीवर दरवर्षी निघून ठिकठिकाणी सत्ता केंद्रे काबीज करण्याचा खटाटोप करणे ही या जमातीची नैसर्गिक लक्षणे. मग ते क्षत्रीय नव्हेत तर कोण?

माध्यमिक शाळेतील शिक्षक हे तर खरेखुरे वैश्य. वैश्यांचा उद्योग व्यापार कर-

ण्याचा. इकडचा माल तिकडे देऊन मधे कमिशन मिळवणे हे त्यांच्या धंद्याचे स्वरूप. आमचे माध्यमिक शिक्षकही पुस्तकातले तयार ज्ञान मुलांच्या खिशात टाकतात. आणि मधे स्वतःचे पगाराचे कमिशन उपटतात. व्यापाऱ्यांचा जसा प्रत्यक्ष उत्पादनाशी संबंध नसतो तसाच यांचाही प्रत्यक्ष ज्ञानाशी नसतो. शिकवण्यांच्या रूपाने काळा बाजार यांचाही चालू असतो. एखादा सचोटीचा व्यापारी आपल्याला केव्हातरी भेटतो आणि आपल्याला धक्का बसतो. तसाच एखादा प्रामाणिक, ध्येयवादी शिक्षक भेटला म्हणजेही आपल्याला धक्का बसतो.

राहता राहिले प्राथमिक शिक्षक. आर्थिक दृष्टचा ते शूद्र तर खरेच. पण इतरही एक–दोन कसोटचांना ते उतरतात. शूद्र समाज लवकर संघटित होतो. त्याप्रमाणे हा वर्गही लवकर संघटित होतो. 'सेवावृत्ती' हे लक्षण याही वर्गात आढळते. अनेक वेदोक्त कर्मांत शूद्रांना जसा अधिकार नाही तसा शिक्षणक्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या बाबीत यांना कुणीच विचारीत नाही.

प्रिय वाचक, हे सगळे वर्णन फार अप्रिय वाटते काय ? तसे वाटण्याचे काही कारण नाही. 'चातुर्वर्ण्य' या संस्थेची महतीच तशी आहे. एक वेळ सामाजिक आणि धार्मिक चातुर्वर्ण्य लवकर नष्ट होईल, नव्हे, होतच आहे. पण राजकारण, अर्थकारण, शिक्षणक्षेत्र यात सुरू झालेले चातुर्वर्ण्य लवकर नष्ट होणे कठीण. मध्येच कुणीतरी आपला एक वर्ण सोडून दुसऱ्या वर्णात जातो. पण त्यामुळे काही फारसे बिघडत नाही. चातुर्वर्ण्य आपले कायम आहे !

## □ फिरून एकदा उद्घाटन

नाशिक नगरपालिका पाणी शुद्धीकरण योजनेचे उद्घाटन मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांच्या हस्ते करण्यात येणार आहे असे वृत्त वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले आहे. या वृत्ताच्या संदर्भात नाशिक नगरपालिकेच्या सदस्यांनी एक पत्रक प्रसिद्ध केले आहे. यांचे म्हणणे असे की, या योजनेचे उद्घाटन यापूर्वीच महाराष्ट्र राज्याच्या चीफ इंजिनीअरांच्या हस्ते झाले आहे. मग पुन्हा उद्घाटनाची आवश्यकता काय ? एकाच योजनेचे दोनदा उद्घाटन करणे म्हणजे उद्घाटकांनी एकमेकांचा अपमान करण्यासारखे आहे आणि तो पैशाचाही अपव्यय आहे. तेव्हा आता पुन्हा उद्घाटनासाठी मुख्यमंत्र्यांनी येण्याची गरज नाही.

नाशिक शहराला महाराष्ट्रात मोठे स्थान आहे. मुंबई–पुण्यानंतर नाशिक, कोल्हापूर, सोलापूर हीच गावे (पश्चिम महाराष्ट्रात) डोळचासमोर येतात. तिथले नगरपिते समंजस असतील अशी माझी समजूत होती. पण हे पत्रक वाचून माझा भ्रमनिरास झाला. अगदी चमत्कारिक मंडळी आहेत झाले ! उद्घाटनासारखा चटकदार सोहळा आणि मुख्यमंत्र्यांचे आगमन या गोष्टीला विरोध करणाऱ्यांची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच. कारण काय तर म्हणे एकदा उद्घाटन झाले आहे या योजनेचे. बरे मग ? समजा, झाले आहे. मग पुन्हा कुणी दुसऱ्यांदा उद्-

घाटन करू नये हे कुठले शास्त्र? दोनदा नव्हे तर तीनदा झाले तरी बिघडले कुठे? त्या निमित्ताने समारंभ घडून येतो. हौशी माणसे एकत्र येतात. सभा, व्याख्याने, फोटो व जेवणीखाणी असे रम्य कार्यक्रम होतात. तेवढेच चार दिवस आनंदात जातात. उद्‌घाटन करण्यासाठी आलेल्या पाहुण्याशी कार्यकर्त्यांना आपापले हितगुज करता येते. अनेकांच्या महत्त्वाकांक्षेचे त्यातूनच उद्‌घाटन होते. कितीतरी गोष्टी घडतात. शुभ गोष्टी पुन्हा पुन्हा घडल्या तर चांगले की वाईट? नाशिकला निदान एकाच्या हस्ते पहिल्यांदा उद्‌घाटन आणि दुसऱ्या उद्‌घाटनाला निराळा महापुरुष तरी आहे. एका गावी तर ज्या मंत्र्याच्या हस्ते एकदा एका इमारतीचा भूमिपूजन समारंभ झाला, त्याच्याच हस्ते पुन्हा त्याच इमारतीचा भूमिपूजनाचा कार्यक्रम तीन वर्षाच्या अंतराने घडून आला. ते मंत्रीही आपल्या भाषणात म्हणाले, म्हणतात की, या जागेत पूर्वी एकदा आल्यासारखे आठवतय. तेव्हा त्यांचा संशय फेडण्यासाठी, त्याता एकल्या बुद्धिमान पुरुषाने चक्क सांगितले की, "अहो, आठवतय म्हणजे काय? आठवणार, आपणच नाही का, तीन वर्षापूर्वी याच इमारतीचे भूमि-पूजन याच जागेवर केले?"– हे मार्मिक वचन ऐकून मंत्रीमहाशयांना काय वाटले ते काही कोठे प्रसिद्ध झालेले नाही. पण नक्कीच त्यांना कर्तव्यपूर्तीचा डबल आनंद झाला असणार.

दुसरा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो नाशिककर नगरपित्यांच्या लक्षात आलेला दिसत नाही. उद्‌घाटन हे नेहमी मंत्र्यांच्याच हस्ते होत असते. इतरांनी केले तर त्याला तितकीशी मजा येत नाही. उद्‌घाटन, पायाभरणी, शिलान्यास या गोष्टी खास मंत्र्यांच्याच सोयीसाठी निर्माण झाल्या आहेत. त्यांचा या भूतलावरील अवतारच या ईश्वरी कार्यासाठी आहे. अवतारी पुरुषांना आपले कार्य पुरे करू न देता कुणीतरी फालतू माणसानेच ते आधी पूर्ण करणे याला काही अर्थ आहे काय? कृष्णाच्या हस्ते एकदा कंसाचा वध व्हायचा ठरले म्हणजे मग तो कृष्णाच्याच हस्ते व्हायला नको का? उद्या अक्रूर नाहीतर उद्धव या गृहस्थांनी आधीच कंसाचा मुडदा पाडला तर कसे वाटेल? मग कृष्णावतार कशासाठी? रावणाला जटायूनेच मारून टाकले तर मग रामअवतार कशासाठी? तसेच हे उद्‌घाटन जर मंत्र्यांच्या हस्ते नाही तर मग मंत्री कशासाठी?

ते काही नाही! मुख्यमंत्र्यांचे पाय या निमित्ताने नाशकाला लागत असतील तर आनंदाची गोष्ट आहे. ज्यांनी कुणी मुख्यमंत्र्यांना बोलवण्यासाठी हा फेर उद्-घाटनाचा घाट पुन्हा घातला त्यांच्या डोळ्यासमोर हाच शुद्ध आणि पवित्र हेतू असावा. त्यांना आपला पाठिंबा देऊ या. मित्रांनो, घाबरून जाऊ नका. शक्यतो माघार घेऊ नका. मुख्यमंत्र्यांनी उद्‌घाटन केले तर काही महिन्यांनी आणखी एका मंत्र्याला बोलावून तिसऱ्यांदा हा समारंभ साजरा करा. 'अधिकस्य अधिकं फलम्' म्हणतात ते काय उगीच? ○


पाळण्याला सुटी
रामू आता तीन वर्षांचा झाला आहे.
जन्मापासून पाळणा त्याचा जोडीदार होता.
पण आपण आता मोठे झालो आहोत
असे रामूला वाटते. झोके देणारा, झोप आणणारा
पाळणा आता त्याला नको वाटतो. म्हणून पाळण्याला
सुटी मिळाली आहे. आता तो पाळण्याचा उपयोग
खेळणी, चित्रे वगैरे ठेवण्याकडे करीत असतो. आई हे
कौतुकाने पाहते. रामू खुषीत आहे. आईलाही समाधान
आहे. "आपण पाळण्याला सुटी दिली हे किती चांगल
झाले !" रामूचे वडील तसाच समाधानाने पत्नीला
सांगतात. होय, त्यांनी फार चांगली गोष्ट केली.
शहाणे आईबाप
आपले कुटुंब मर्यादित
ठेवतात. मुले कमी होऊ देणे एवढेच
कुटुंब नियोजनाचे उद्दिष्ट नाही. पाहिजेत
तितकीच व पाहिजेत तेव्हाच मुले होऊ देणे त्यामुळे
शक्य होऊ शकते. अपत्यजन्म ही आता योगायोगाची
किंवा नशिबाची गोष्ट नाही; ती तुमच्या
हातातील गोष्ट आहे. असे
प्राप्त होण्याचे कारण—
कुटुंब नियोजन.
मोफत सल्ला मिळण्यासाठी नजीकच्या
कुटुंब नियोजन केंद्राला भेट द्या.

व्हिएतनाम युद्धाच्या खालोखाल

जीवितहानी या युद्धात होत आहे.

# ।। बायफ्रा ।।

रोज सहा हजार भूकबळी, नुसत्या कल्पनेनेच अंगावर शहारे येतात. पण पश्चिम आफ्रिकेतील नायजेरिया संघराज्यातून फुटून निघालेल्या बायफ्रा राज्यातील दुर्दैवी जनतेवर ही आपत्ती ओढवलेली आहे. हा केवळ नैसर्गिक दुष्काळ नाही. बायफ्राच्या जनतेची उपासमार करून त्यांना शरण आणावयाचे या उद्देशाने नायजेरियाच्या संघराज्य सरकारने त्यांची सर्व बाजूने कोंडी केली आहे. नायजेरियाचे नेते एवढेच करून थांबलेले नाहीत, तर बायफ्राचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट करण्यासाठी शेवटची निर्णायक लष्करी मोहीम त्यांनी सुरू केली आहे. बायफ्राच्या जनतेस प्रथम शरण आणावयाचे व मग त्यांना अन्न द्यावयाचे असे नायजेरियाच्या नेत्यांचे धोरण आहे. राजकारणाने माणुसकीचा बळी घेतला आहे. दुष्काळ आणि यादवी युद्ध अशा दुहेरी आपत्तीला धैर्याने तोंड देऊन आपले अस्तित्व टिकविण्यासाठी बायफ्राची जनता लढत आहे.

नायजेरियन सरकारच्या अंदाजाप्रमाणे रोज तीन हजार भूकबळी पडत आहेत. पण मदतकार्य सुसूत्रता संघटनेचे प्रमुख डच डॉक्टर हरमन मिडलकोप यांच्या अंदाजाप्रमाणे रोज सहा हजार लोक उपासमारीला बळी पडत आहेत. सहाशे

— — — — — —

वा. दा. रानडे

— — — — — —



बायफ्राचे स्वातंत्र्य योद्धे

निर्वासित छावण्यात साडेसात लाख लोक राहतात. त्यांनी पाठविलेल्या माहितीवर मिडलकोप यांचा अंदाज आधारलेला आहे. गेल्या पन्नास वर्षांत कधी झाली नव्हती एवढी अतिवृष्टि या वर्षी झाली. त्यामुळे हे दुष्काळाचे संकट ओढवले.

नायजेरियाने जिंकलेल्या बायफ्राचे प्रदेशात भूकबळी हे आता नित्याचेच दृश्य झाले आहे. मदतकार्याच्या दृष्टीने पाहणी करण्यासाठी एव्हरेस्ट विजेते लॉर्ड जॉन हंट एका ब्रिटिश शिष्टमंडळाचे प्रमुख म्हणून नुकतेच नायजेरियास गेले होते. कॅलाबार शहराजवळच्या एका हॉस्पिटलला त्यांनी भेट दिली. पायाच्या काड्या झालेल्या एका मुलाकडे पाहून ते नर्सला म्हणाले, " हे मूल अगदी मरणोन्मुख अवस्थेत आहे.'' नर्सने नुसती होकारार्थी मान हलविली. तिने असे अनेक भूकबळी पाहिले होते.

बायफ्राच्या नियंत्रणाखाली असलेल्या ९००० चौरस मैलांच्या प्रदेशात परिस्थिती अशीच किंवा यापेक्षा वाईट आहे. निर्वासित छावण्यातील लोकांना रोज फक्त एक वेळ थोड अन्न दिले जाते. छावण्याबाहेर शहरे व खेड्यातून चाळीस लाख निर्वासित आहेत. त्यांना उंदीर अन्न म्हणून विकले जातात. बायफ्राचे सैनिकांनाही पुरेसे अन्न मिळत नाही. बायफ्राची सर्व बाजूंनी कोंडी करण्यात आल्यामुळे भाववाढ भरमसाट झाली आहे. ॲस्पिरिनच्या एका गोळीस १४ सेंट (सुमारे एक रुपया), बिअरच्या एका बाटलीस २·८० डॉलर, सायकलला २८० डॉलर (१९६० रु.), एक डझन अंड्यांना २८ रु., बिनबाह्याच्या शर्टची किंमत १४ डॉलर, सिगारेटच्या

पाकिटास ३० डॉलर, काडचापेटीस १ डॉलर अशीही भाववाढ आहे. धान्य किंम त्रिप्पट वाढल्या आहेत.

फर्नांडो पो या जवळच्याच स्पॅनिश बेटावर हजारो टन धान्यसाठे पडून आहेत पण भुकेल्या बायफ्रा जनतेपर्यंत ते पोचू शकत नाही, ही खरी दु:खांतिका आहे हे धान्य कसे पाठवायचे, विमान मार्गाने की जमीन मार्गाने याबद्दल बायफ्रा व नायजेरियाचे नेत्यात एकमत न झाल्याने हे साठे पडून आहेत. धान्य व औषध विमानांनी मिळावीत अशी बायफ्राची मागणी आहे, तर जमिनीच्या मार्गानेच धान्य जाऊ देउ विमान– मार्गाच्या सुरक्षिततेची हमी आम्ही देऊ शकत नाही अशी नायजेरियाची भूमिका आहे. तडजोड होत नाही याचे कारण दोन्ही बाजूंना एकमेकांबद्दल अविश्वास वाटतो. विमानाने धान्य पाठवायला परवानगी दिली तर धान्याबरोबर किंवा धान्याच्याऐवजी शस्त्रे जातील अशी भीती नायजेरियाच्या नेत्यांना वाटते तर जमिनीच्या मार्गाने धान्य आल्यास नायजेरियाचे सैनिक त्यात विष मिसळतील अशी भीती बायफ्राच्या नेत्यांना वाटते. रेडक्रॉसने विमानाने धाान्य पुरवठा सुरू केला होता पण नायजेरियाचे विमान विरोधी तोफांनी काही विमाने पाडल्याने ही वाहतूक मध्यंतरी काही दिवस बंद ठेवण्यात आली. रेडक्रॉसने आता धोका पत्करून पुन: ही वाहतूक सुरू केली आहे. पाच सप्टेंबरपासून दहा दिवस धान्य पाठविण्यास रेडक्रॉसला नायजेरियन सरकारने परवानगी दिली होती.

बायफ्राच्या दुष्काळग्रस्त जनतेची किमान गरज भागविण्यासाठी रोज अडीचशे टन धान्य त्यांच्यापर्यंत पोचायला हवे. एक विमान दहा टन धान्य नेऊ शकते. म्हणजे पंचवीस विमाने हवीत. रेडक्रॉसजवळ एवढी विमाने उपलब्ध नाहीत.

उत्तर नायजेरियात धान्य वाया जात आहे. किंमती खाली आल्या आहेत. लोक आपल्याजवळचे धान्य विकू शकत नाहीत, असे त्या भागात दौरा करून आलेले ब्रिटिश खासदार निगेल फिशर व जेम्स जॉन्सन यांना आढळून आले.

उपासमारीचा तीस टक्के दोष बायफ्राकडे आहे हे बायफ्राचे नेते ओजुकवू यांनी मान्य केले. आम्हाला आणखी बरेच करता येण्यासारखे आहे असे त्यांनी सांगितले. काय करता येईल हे ते स्वत: पुढाकार घेऊन दाखवीत आहेत. गोगलगाय हे कनिष्ठ प्रतीच्या लोकांचे अन्न म्हणून इबो (बायफ्राचे नागरिक) त्याचा तिटकारा करतात. पण यात काही कमीपणा आहे असे मानण्याचे कारण नाही हे दाखविण्यासाठी ओजुकवू आपल्या गावी गेले व गोगलगाय खाण्याचा जाहीरपणे कार्यक्रम त्यांनी केला.

बायफ्राला विमानाने धान्यपुरवठा होणे ही घटना जगाची आपल्यास सहानुभूती असल्याचे प्रतीक आहे या दृष्टीने ओजुकवू त्याकडे पाहतात. म्हणूनच जमीनमार्गाने धान्य पुरवठ्याची सूचना अमान्य करून विमानमार्गे पुरवठ्याचा आग्रह त्यांनी धरला. जमीनमार्गेच धान्य पुरवठा व्हावा असा आग्रह धरण्यात संघराज्य सरकार-

चाही राजकीय उद्देश होता. जमीनमार्गे धान्य पाठवावयाचे म्हणजे ते संघराज्याच्या प्रदेशातून पाठवावयाचे, संघराज्य सरकारची परवानगी त्यासाठी घ्यावी लागणार, यात आपली श्रेष्ठता प्रस्थापित होते असे संघराज्य नेत्यांना वाटत होते म्हणून जमीन मार्गाबद्दल त्यांचा आग्रह होता. बायफ्राच्या भुकेल्या जनतेस तातडीने मदत पुरविण्यापेक्षा आपले राजकीय उद्देश साधण्यावरच दोन्ही बाजू भर देत आहेत. राजकारणाने माणुसकीचा बळी घेतला आहे असे मी सुरुवातीस म्हटले ते याच अर्थाने.

बर्लिनची रशियाने केलेली कोंडी मोडण्यासाठी तातडीने विमानांनी रसद पोचविणारी अमेरिका, बायफ्राचे बाबतीत स्वस्थ बसली याचे कारण विमानाने धान्यपुरवठा करण्यास नायजेरियाच्या संघराज्य सरकारची परवानगी मिळाली नसती. आणि अशा परवानगीशिवाय धान्यपुरवठा केला असता तर त्यामुळे नायजेरियातील पाच हजार अमेरिकनांचे जीव धोक्यात येण्याचा संभव होता. तसेच या हस्तक्षेपाने आफ्रिकन जगतात अमेरिकेबद्दल तीव्र प्रतिक्रिया झाली असती म्हणून अमेरिकेने काही न करण्याचे ठरविले.

## चळवळीची पार्श्वभूमी

भारतातून पाकिस्तान फुटून निघाला. कटांगाने कांगोतून फुटण्याचा प्रयत्न केला. बायफ्राची चळवळ त्याच स्वरूपाची आहे की तिचे स्वरूप काही निराळे आहे हे समजून घेण्यासाठी नायजेरिया संघराज्याच्या स्थापनेपासून या चळवळीची पार्श्वभूमी पाहिली पाहिजे.

नायजेरिया १९६० साली स्वतंत्र झाला. आकाराने हा देश जवळजवळ पाकिस्तानएवढा असून लोकसंख्या सहा कोट आहे. तेल उत्पादनाच्या बाबतीत जगात त्याचा पाचवा क्रमांक आहे. नायजेरिया उत्तर, पश्चिम व पूर्व अशा तीन प्रदेशांचा बनला असून एकेक प्रदेश एकेका राष्ट्राएवढा मोठा आहे. देशात अडीचशेपेक्षा अधिक वन्य जमाती असल्या तरी उत्तर भागात हौसा आणि फुलानी, पश्चिम भागात योरूबा आणि पूर्व भागात इबो या मुख्य जमाती आहेत. उत्तर विभाग बाकीच्या दोन्ही विभागांच्या एकत्र क्षेत्रफळापेक्षाही मोठा आहे. हौसा व फुलानी जमाती मुस्लीम असून सरंजामशाही युगाचा अजून त्यांच्यावर पगडा आहे. पश्चिम विभागातील योरूबा व पूर्व विभागातील इबो मुख्यतः ख्रिती आहेत. उत्तरेकडच्या जमातीपेक्षा ते अधिक शिक्षित व महत्त्वाकांक्षी आहेत. व्यापार व उद्योगधंदे त्यांच्या ताब्यात आहेत, सनदी नोकऱ्यातही त्यांचा भरणा जास्त आहे. त्यामुळे उत्तरेकडच्या शेतीप्रधान, अविकसित लोकांना त्यांच्याबद्दल वैषम्य वाटते. पण संघराज्याच्या राजकारणात उत्तरेचे प्रभुत्व असल्याने पश्चिम व पूर्व भागातील नेत्यांमध्ये वैफल्याची भावना निर्माण झाली होती.

उत्तरेचे वर्चस्व नाहीसे करण्यासाठी काही लष्करी अधिकाऱ्यांनी जनरल इरो-

न्सीचे नेतृत्वाखाली जानेवारी १९६६ मध्ये उठाव केला. फेडरल, उत्तर व पश्चिम भागाच्या नेत्यांना ठार केले आणि सत्ता हाती घेतली. इरोन्सी इबो नेता होता. त्याची राजवट फार काळ टिकली नाही. सहा महिन्यातच उत्तरेकडच्या लष्करी अधिकाऱ्यांनी कर्नल गो वोनचे नेतृत्वाखाली उठाव करून इरोन्सीचा खून केला व सत्ता आपल्या हाती घेतली. यानंतर उत्तरेकडील इबोंची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली. इबो सनिकांना त्यांच्या बराकीतून ओढून काढून संगिनीने ठार करण्यात आले. उत्तरेकडील प्रत्येक शहरात इबोंनी नोकरीच्या शोधात असलेल्या आपल्या बांधवांसाठी वसतिगृहे बांधलेली आहेत. उत्तरेकडील सैनिकांनी व हौसा जमातीच्या लोकांनी या वसतिगृहामध्ये शिरून इबोंची कत्तल केली. विषारी बाणापासून शॉटगनपर्यंत सर्व प्रकारची शस्त्रे घेऊन शहराच्या सर्व भागात ते हिंडले व दिसेल त्या प्रत्येक इब्रोला त्यांनी ठार केले. दोन आठवडे चालू असलेल्या या पद्धतशीर कत्तलीत तीस हजार इबो ठार झाले. लाखो अपंग झाले.

या अमानुष कत्तलीनंतर नायजेरियन संघराज्यात सलोख्याने राहण्याची सर्व आशा पूर्वेकडील इबो नेत्यांनी सोडून दिली. आपले अस्तित्व कसे टिकवायचे हाच त्यांच्यापुढे मुख्य प्रश्न होऊन बसला. इबोंची मुख्यवस्ती पूर्व विभागात आहे. पूर्व-विभागाबाहेर राहणाऱ्या सर्व इबोंना कुटुंबप्रमुख व गावप्रमुखांकडून अक्षरशः लाखो संदेश गेले, 'घरी परता.' आणि नायजेरियाच्या प्रत्येक कोपऱ्यातून, घेता येईल तेवढे सामान बरोबर घेऊन इबो निघाले. मालगाडीतून, पॅसेंजरमधून, सायकल-वरून किंवा डोक्यावर सामान घेऊन पायी ते आले. परदेशातील इबोंनाही ही 'घरची हाक' पोचली. इंग्लंड, अमेरिकेन वैद्यकीय तज्ज्ञ, विद्यापीठात प्राध्यापक अशा मोठ्या जागांवर ते होते. पण त्यांच्यापैकी बहुसंख्य त्या नोकऱ्या सोडून परतले.

सरकार, लष्कर, उद्योगधंदे यात महत्त्वाच्या जागांवर इबो होते. नायजेरियाची अनेक हॉस्पिटले त्यांनी चालविली होती. इंजिनीअरिंगची मोठी कामे केली होती. मोठ्या व्यापारी कंपन्या काढल्या होत्या. ते गेल्याने त्यांची जागा भरून काढू शक-णारे तज्ज्ञ कोठून आणावयाचे, असा प्रश्न नायजेरियन सरकारला पडला. आर्थिक घडी विस्कळीत झाली.

इबोंचे नेते ओजुकवू व नायजेरियन संघराज्य सरकारचे नेते गौवोन यांच्यात एकेकाळी तडजोडीची शक्यता वाटत होती. इबोंच्या भागास अंतर्गत स्वायत्तता व संरक्षणाची हमी द्यावयाची आणि त्यांनी संघराज्यात राहणे मान्य करावयाचे अशा प्रकारची ही तडजोड होती पण इबोंनी स्वतंत्र सेना ठेवण्याचे प्रश्नावर बोलणी फिसकटली. गोवोन यांनी स्वतंत्र सेनेची मागणी फेटाळली.

यानंतर इबोंची कटुता वाढविणारी आणखी एक घटना म्हणजे नायजेरियन संघराज्याचे चारऐवजी बारा भाग पाडण्यात आले. त्यात इब्रोंचा पूर्व विभाग

सलग एकत्र न ठेवता त्याचे तीन भाग करण्यात आले. आपल्या भागातील तेलाचा टापू व किनाऱ्यापासून आपणास मुद्दाम अलग केले आहे अशी त्यांची प्रतिक्रिया झाली.

संघराज्यात राहण्यात आपले हित नाही, आपल्याला सुरक्षितताही नाही, अशी खात्री झाल्यावर इबोंचे नेते ओजुकवू स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या तयारीस लागले. प्रथम आपल्या विभागातून उत्तरेकडील लोकांची त्यांनी हकालपट्टी केली आणि स्वतःची सेना उभारली. नंतर ३० मे १९६७ ला स्वतंत्र बायफ्रा प्रजासत्ताक स्थापन झाल्याची घोषणा त्यांनी राजधानी एतुगू येथे समारंभाने केली.

बायफ्रा म्हणजे कटांगासारखीच फुटीर राज्याची चळवळ आहे या कल्पनेने बाहेरच्या जगाने प्रथम या नव्या राज्यास सहानुभूती किंवा पाठिंबा दर्शविला नाही. ब्रिटन, युरोपातील राष्ट्रे, रशिया यांनी नायजेरिया संघराज्यालाच पाठिंबा दिला. रशियाने तर स्वयंचलित रायफली, भरपूर दारूगोळा, तोफा, मॉर्टर्स, ग्रेनेड लाँचर्स, विमानविरोधी तोफा, चेकोस्लोव्हाक डेल्फिन जेट विमाने, मिग विमाने, इल्युशिन बाँबर विमाने वगैरे नायजेरिया संघराज्य सरकारने मागितलेली सर्व प्रकारची शस्त्रे पुरविली. याचा परिणाम म्हणजे जंगलात आधुनिक शस्त्रांनी लढले गेलेले आफ्रिकेतील पहिले युद्ध असे स्वरूप या यादवी युद्धास आले.

## चौदा महिन्यांचे यादवी युद्ध

नायजेरिया–बायफ्रा यादवीयुद्ध गेले चौदा महिने चालू आहे. 'झटपट उरकावयाच्या शस्त्रक्रियेसारखी ही पोलिस कारवाई आहे,' असे नायजेरियन संघराज्य सरकारचे प्रमुख गोवोन म्हणत, पण या बाबतीत त्यांचा अंदाज चुकला. पंधरा दिवसात, तीन आठवड्यात युद्ध संपवू, असे वायदे त्यांनी अनेकदा केले, पण ते चुकले. बायफ्राविरुद्ध त्यांनी आता शेवटची निर्णायक मोहीम सुरू केली आहे. बायफ्राच्या ताब्यात असलेल्या तीन महत्त्वाच्या शहरांपैकी अबा शहर जिंकल्याचा दावा नायजेरियन फौजांनी नुकताच केला होता, पण शहर पडलेले नाही, आम्ही हल्ला परतवून लावला, असा बायफ्राचा दावा आहे. नायजेरियन फौजा सबंध बायफ्रा कदाचित जिंकून घेतीलही, पण बायफ्राची जनता गनिमी लढा चालूच ठेवील. त्या दृष्टीने त्यांनी तयारी केलेली आहे.

'आम्हाला इबो जमात नष्ट करावयाची नाही. फक्त त्यांचे फुटीर राज्य नष्ट करावयाचे आहे,' असे नायजेरियन संघराज्याचे नेते म्हणत असले तरी इबोंचा प्रत्यक्ष अनुभव तसा नाही. उत्तर विभागातील इबोंची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली. सुरक्षित जीवनाचीच शाश्वती न राहिल्याने दहा लक्ष इबो निर्वासितांचा लोंढा अनेक वर्षे बस्तान बसविलेले आपले उद्योगधंदे सोडून उत्तरेतून पूर्व विभागात आला. बायफ्राविरुद्ध लष्करी मोहीम करणारे नायजेरियन संघराज्याचे सैनिक जी युद्धगीते गात कूच करतात, त्यात नायजेरियाच्या एकतेपेक्षा इबो जमात नष्ट करण्याचीच भाषा अधिक असते. काबीज केलेल्या प्रत्येक खेड्यातून इबो टोळी-

वाल्यांना भिंतीशी उभे करून त्यांच्या हातापायातून भिंतीत खिळे ठोकण्यात येतात. नंतर स्वयंचलित रायफलने त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात येतात किंवा पलित्यांनी कपडे पेटविण्यात येतात. सैनिकांनी स्त्रियांवर बलात्कार केल्याच्या व जिंकलेल्या गावातील सर्व गावकऱ्यांना ओळीने उभे करून गोळ्या घालून ठार केल्याच्या बातम्या आहेत. आपली सबंध जमात नष्ट करण्याचा उत्तरेकडील हौसा टोळी-वाल्यांचा उद्देश आहे, अशी या अनुभवाने इबोंची खात्री झाली आहे. पण त्यामुळे हतबल न होता उलट शेवटपर्यंत लढण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. "आम्ही आमच्या खेड्यात परतून शत्रूच्या पिछाडीस त्याला सतत हैराण करू. आम्ही ही लढाई जिंकण्यासाठी लढत नसून अस्तित्व टिकविण्यासाठी लढत आहोत," असे ओजुकनू म्हणतात.

"आमचे युद्ध इबोंविरुद्ध नाही. राष्ट्राचे ऐक्य मोडणारा ओजुकवू व त्यांच्या बंडखोर गटाविरुद्ध आहे. इबोंना आम्ही नष्ट करणार, हा आरोप खरा नाही. लागोसमध्ये तीस हजार इबो असून त्यांची परिस्थिती बायफ्रातील इबोंपेक्षा चांगली आहे," असे संघराज्य सरकारचे प्रमुख गोवोन म्हणतात. "इबो संघराज्यात परत आले आणि प्रामाणिकपणे राहण्याची त्यांची तयारी असली तर भूतकाळ विसरून नायजेरियन त्यांचे खुल्या दिलाने स्वागत करतील," असे ते सांगतात. पण त्यावर इबोंचा विश्वास बसत नाही. उत्तर विभागात इबोंची झालेली सामुदायिक कत्तल आणि सैनिक अजूनही करीत असलेली कत्तल लक्षात घेता गोवोन यांच्या आश्वा-सनावर कसा विश्वास ठेवावयाचा, असे त्यांना वाटले तर ते स्वाभाविक आहे.

वायफ्रा राज्याचे मूळ क्षेत्रफळ २९ हजार चौरस मैल. युद्धात दोन तृतीयांश प्रदेश त्यांनी गमावला असून आता फक्त एक तृतीयांश टापू त्यांच्या हाती आहे. झटपट गनिमी हल्ले करून शत्रूस हैराण करण्यावर त्यांचा भर आहे. युद्धात त्यांच्या बाजूने लढणारे काही युरोपियन भाडोत्री सैनिक व अधिकारी या तंत्रात तरबेज आहेत. नायजेरियन संघराज्याच्या फौजांची निर्णायक मोहीम सुरू होण्यापूर्वी बायफ्राच्या गनिमी सैनिकांनी ओवेरीजवळ संघराज्य सेनेचे पिछाडीस छुपा हल्ला करून ११६ संघराज्य सैनिकांना ठार केले होते.

युद्ध मुख्यत: बायफ्राच्या भूमीवर चालू आहे. संघराज्य प्रदेशात त्याची प्रत्यक्ष झळ लागलेली नाही. राजधानी लागोसमध्ये विजेची बचत करण्यासाठी व हवाई हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी रस्त्यावरचे दिवे मंद असतात, पण हवाई हल्ल्याची शक्यता नाही. चोरून शस्त्र निर्यात केली जात नाही, याची पाहणी करण्यासाठी मोटारींची झडती घेतली जाते. त्यामुळे रहदारी तासन् तास खोळंबून राहते. या गोष्टी सोडल्या तर वातावरण युद्धपूर्व काळासारखेच आहे.

मनुष्यबळ व शस्त्रबळाने संघराज्य सरकार भारी असले तरी परदेशात बाय-फ्राचा प्रचार अधिक प्रभावी ठरला आहे. या प्रचारामुळेच चेकोस्लोव्हाकिया,

नेडलँडस व बेल्जम या तीन राष्ट्रांनी संघराज्य सरकारला शस्त्रपुरवठा करणे बंद केले आहे. गेबन, झांबिया, टांझानिया व आयव्हरी कोस्ट या चार अफ्रिकन राष्ट्रांनी बायफ्रास मान्यता दिली आहे. फ्रान्सचे अध्यक्ष द गॉल हा बायफ्रास मिळालेला नवा मित्र. लोकांच्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाच्या पायावर हा प्रश्न सोडविण्याची सूचना त्यांनी केली. ॲडमन एच. विल्यमबर्नहार्ट या अमेरिकनच्या मालकीची जिनीव्हातील एक फर्म प्रचारकार्यात बायफ्रास मदत करीत आहे. बायफ्रासंबंधी बातम्या ती पाठविते. पश्चिम युरोपातील देशांच्या सत्तर वार्ताहरांना बायफ्रात जाण्यासाठी विमान प्रवासाची सवलत तिने दिली व त्यांचे अहवाल त्यांच्या वृत्तपत्रांना पाठविले.

प्रचारयुद्धात आपण मागे पडल्याची कबुली संघराज्य सरकारला द्यावी लागत आहे. माणसासाठी अन्न म्हणून बाजारात उंदीर विकले जातात याची अनेक चित्रे पाश्चात्य पत्रांनी प्रसिद्ध केली. त्याबद्दल बोलताना संघराज्य सरकारचे वाहतूक मंत्री जोसेफ तारका म्हणाले, "आमच्या भागात उंदीर रुचकर खाद्य मानले जाते. बेडकाचे पाय खाण्यापेक्षा उंदीर खाणे मी अधिक पसंत करीन."

निरनिराळ्या भिन्न जमाती असलेल्या देशात अल्पसंख्य जमातीचे हक्क व हितसंबंध सुरक्षित राहणार की नाही, तिच्या विकासास पूर्ण संधि मिळणार की नाही




The TB Association of India has selected this design for their 19th TB seal campaign which will commence on Oct. 2. The design was drawn by the Art Dept. of THREE BROTHERS AND FILS, of Bombay.

हा प्रश्न या यादवी युद्धाने उपस्थित केला आहे. "अल्पसंख्य जमातीचा छळ निमूटपणे सहन केला जाणार नाही. तो करणारांना शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाही, हा इशारा बायफ्रा इतर राष्ट्रांना देत आहे," असे बायफ्राचे नेते ओजुकवू म्हणतात. त्यांच्या भूमिकेतील तथ्य चार अफ्रिकन राष्ट्रांना पटले म्हणूनच त्यांनी बायफ्रास मान्यता दिली. टांझानियाचे नेते ज्युलियस न्येरेरे बायफ्रास आपण का पाठिंबा देत आहोत हे सांगताना म्हणाले, "हजारो लोकांना ठार करणे व ही कत्तल पुढे चालू ठेवणे तुम्हाला एकीच्या नावाखाली करता येणार नाही. ठार झालेले व ठार करणारे यांची एकी होऊ शकत नाही."

आफ्रिकन ऐक्य संघटनेच्या सभासदांचा मात्र नायजेरियन संघराज्य सरकारला पाठिंबा आहे. भिन्न जमातींनी, टोळयांनी एकत्र कसे नांदावयाचे हा प्रश्न प्रत्येक आफ्रिकन देशापुढे आहे. प्रत्येक जमात फुटून निघू म्हणेल तर ऐक्य टिकावयाचे कसे? नायजेरियन संघराज्याचे प्रमुख गोवोन म्हणतात, "काल कांगो व चोंबे, आज नायजेरिया व ओजुकवू. उद्या कोणता आफ्रिकन देश यास बळी पडणार आहे हे कोणी सांगावे? वास्तविक आफ्रिकन राष्ट्रांनी एकत्र येऊन समाईक बाजार-पेठेसारख्या परस्पर सहकार्याच्या योजना हाती घ्यावयास हव्या पण यादवी युद्धाने प्रत्येक आफ्रिकन देशाची छकले पडू लागली तर हे कसे साधणार?"

संघराज्य टिकण्यातच नायजेरियाचे हित व विकास आहे यात शंका नाही. निरनिराळ्या जमातींचा परस्परांवर विश्वास ही संघराज्याच्या एकतेची खरी हमी आहे. आपले प्रभुत्व टिकविण्यासाठी एका जमातीने दुसऱ्या जमातीचा छळ करून, तिची सामुदायिक कत्तल करून एकी कशी टिकेल? आपली सबंध जमात नष्ट होऊ द्यावयाची की ती टिकविण्यासाठी संघराज्यातून फुटून स्वतंत्र राज्य स्थापन करावयाचे असा इबोंपुढे प्रश्न होता. त्यांना दुसरा मार्ग पत्करणे भाग पडले याचा बराचसा दोष संघराज्य सरकारच्या नेत्यांकडे जातो.


इबोंच्या चळवळीची तुलना पाकिस्तान किंवा कटांगाच्या फुटीर चळवळीशी करणे चुकीचे होईल. पाकिस्तान व कटांगाच्या चळवळीस साम्राज्यवादी राष्ट्रांनी उघड उत्तेजन व मदत दिली होती. नवोदित स्वतंत्र राष्ट्रे यादवी युद्धाने ग्रासली जाऊन कमकुवत व्हावी आणि आपले प्रत्यक्ष नव्हे तरी अप्रत्यक्ष वर्चस्व तेथे पुन: प्रस्थापित करता यावे हा त्यामागे उद्देश होता. नायजेरियाच्या बाबतीत तशी परिस्थिती नाही. येथे बायफ्राऐवजी संघराज्य सरकारलाच बड्या राष्ट्रांनी पाठिंबा दिला आहे. बड्या राष्ट्रांपैकी फक्त फ्रान्सचा पाठिंबा बायफ्रास अलीकडे मिळाला आहे.

इबोंना फुटून निघणे भाग पडावे याला संघराज्याचे नेते काही अंशी जबाबदार असले तरी इबो काही अगदी निर्दोषी नाहीत. त्यांच्याही हातून चुका झालेल्या आहेत. इबोंची पद्धतशीर कत्तल करण्यास हौसा जमातीने उद्युक्त व्हावे एवढा

द्वेष त्यांना तरी इबोंबद्दल का वाटतो? इबो हुशार आहेत, कर्तबगार आहेत सरकारी नोकऱ्यात, उद्योगधंद्यात ते मोठ्या पदांवर होते. पण त्यांचा एक मोठा दोष म्हणजे ते संकुचित वृत्तीचे असून केवळ आपल्या जमातीपुरतेच पाहतात. जेथे जातील तेथे आपल्या जमातीचेच लोक गोळा करतात. नोकरी व उद्योगधंद्यात त्यांनाच संधी देतात. स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेल्या सरकारमध्ये त्यांना आपलेच प्रभुत्व हवे होते. पण पंतप्रधान अबुबकर ताफवा कालेवा उत्तरेकडचे होते म्हणून त्यांच्यातील लष्करी अधिकाऱ्यांनी कट करून पंतप्रधानांचा खून केला व इतर उत्तरेकडच्या नेत्यांना ठार केले किंवा पळवून नेले. याचा बदला म्हणून सहा महिन्यांनी उत्तरेकडच्या लोकांनी कट करून सत्ता हाती घेतली व इबोंची पद्धतशीर कत्तल केली.

नायजेरिया सर्वांचा आहे. त्यातील सर्व जमातींना समानतेने वागविले जाईल. सर्वांचे हक्क व हितसंबंध सुरक्षित राखले जातील. सर्वांच्या विकासास वाव मिळेल. कोणत्याही जमातीचे इतरांवर प्रभुत्व असणार नाही. या भावनेने संघराज्य सरकारने कारभार पाहिला तरच निरनिराळ्या जमातीत एकमेकांबद्दल विश्वासाची भावना निर्माण होऊन खरी एकता वाढीस लागेल.

व्हिएट्नाम युद्धाच्या खालोखाल जीवितहानी बायफ्राच्या यादवी युद्धात होत आहे. आतापर्यंत एक लाखावर लोक ठार झाले. बायफ्राच्या ८० लाख इबोंपैकी १५ लाख निर्वासित झाले आहेत. हा प्रश्न तडजोडीने मिटविण्याच्या दृष्टीने आफ्रिकन ऐक्य संघटनेच्या पुढाकाराखाली आदिस अबाबा येथे झालेल्या वाटाघाटी अयशस्वी झाल्या. दोन्ही बाजू आपल्या भूमिकांवर ठाम आहेत. संघराज्य सरकारने निर्णायक मोहीम सुरू केली आहे. बायफ्रावर ते विजय मिळवतीलही. पण केवळ लष्करी बळावर तो कायमचा आपल्या सत्तेखाली ठेवणे त्यांना शक्य होणार नाही. इबोंच्या मनातील कटुता अधिकच वाढेल. पण धुमसणारा असंतोष योग्य संधी साधून पुनः डोके वर काढील. ○



# ऊनपाऊस

## सौ. मंदाकिनी चिपळूणकर

मधू उठला तरी मी आपली त्या दिवशी लोळतच पडले होते. "हं उठा बाई-साहेब – सॉरी ! बाईसाहेब नव्हे आईसाहेब– नाही का आता ?" तो मला चिडवीत म्हणाला. "अं, असं रे काय ?" असं लाजत पुटपुटत मी आणखीनच उशीत डोकं खुपसलं अन् गळ्यापर्यंत पांघरूण ओढून घेतलं. आम्ही दोघं सध्या अतिशय आनंदात होतो. लग्न होऊन चांगली पाच वर्ष झाली होती, तरी आमच्या घरात पाळणा हालत नव्हता, चिमुकली सोन्याची पाऊले आमच्या घरात दुडदुडत नव्हती. सासूबाईंच्या आग्रहाखातर मी पिंपळाचे पार झिजवले, अनेक नवससायास केले. आम्हा दोघांना तर इतकी उत्सुकता लागली होती, पण दव आमच्यावर का रुसलं होतं कोण जाणे ! अखेरीस आता माझी तपश्चर्या फळास आली. सगळी सुखं माझ्या घरीदारी होती. ऋद्धिसिद्धी दोन्ही दोन्ही हातांनी पाणी भरीत होत्या. मनाजोगा पती, भरपूर पैसा, दाराशी गाडी, हाताशी फोन – पण एक मातृत्व नाही म्हणजे स्त्रीजीवनाचं सार्थक नाही हेच खरं – असे अन् हे विचार घोळवीत मी मान वर केली तो मधू माझ्याचकडे पहात होता. मी चटकन त्याच्या गळ्यात हात टाकले. "हो हो, अग पण माझे कपडे चुरगाळतील ना ! मी आता दुकानात चाललो आहे. लोक काय म्हणतील मला ? आणि आज काही चहाबिहा नाही वाटतं आम्हाला ? बाकी आता नाही तरी आमचा दुसराच नंबर लागणार म्हणा ! हं ! " भलामोठा सुस्कारा सोडत डोळ्यांच्या कोपऱ्यातून माझ्याकडे पहात मधू म्हणाला. रोज असेच संवाद घडत आताशा. बाळाबद्दल किती किती बोललं तरी ते संपतच नसे. आज पाळणा आणू या, तर उद्या खेळणी तर परवा कपडे.

मधू गेल्यावर मी तशीच आळसटून खिडकीतून बाहेर बघत उभी होते–किती वेळ कुणास ठाऊक, पण उन्हं बरीच वर आली होती – दहाचा भोंगा पण झाला

**नाही नाही, मी दारुच्या धुंदीत नाही,**
**माझी धुंदी आता उडाली आहे**
**........................**
**जा सुलु, खुशाल जा**
**नालायक नवऱ्याबरोबर कशाला रहातेस ?**
**तुझं जीवन जगण्याचा तुलाही हक्क आहेच.**

---

असावा. तेवढ्यात फोनची घंटा किणकिणली. कुणाचा फोन असावा याचं मनाशी आश्चर्य करीत मी फोन उचलला. " हॅलो कोण बोलतंय ? "

'आपण मिसेस फडके का ? ' अनोळखी पुरुषी आवाजाचं नवल करीत मी उत्तरले " हो हो, मीच ती. " क्षण दोन क्षण शांतता – नंतर " मी पोलीस हेडक्वार्टर्समधून बोलत आहे. " " पोलीसमधून ? मग तुमची काहीतरी चूक होते आहे. "


" नाही नाही, चूक नाही. आम्ही तुमच्या मिस्टरांना अटक केली आहे. त्यांची मनःस्थिती फारच बिघडली आहे. आपण आपला वकील बरोबर घेऊन आलात तर बरं होईल ! " काही उत्तर द्यायला सुचायच्या आतच बोलणं थांबलं. अरे देवा, मी ऐकलेलं खरं का ? का स्वप्न ? सबंध खोली माझ्याभोवती गरगर फिरते आहे असं वाटायला लागलं.

" काय झालं आहे ? लागलं आहे का त्यांना " मी कसंबसं विचारलं. कर्कश आवाजात उत्तर आलं, " नाही, नाही – पण मी स्पष्टच सांगतो तुम्हांला. दोन छोटी मुलं बसची वाट पहात कोपऱ्यावर उभी असताना तुमच्या मिस्टरांनी गाडी त्यांच्या अंगावर घातली– एक मुलगा जागच्या जागी ठार झाला तर दुसरा इस्पितळात मृत्युशय्येवर आहे" फोन बंद झाला. काय घडलं आहे हेच मला कळेना पण दहा मिनिटे शांत बसल्यावर डोकं ताळ्यावर आलं. मग आमच्या वकिलांना घेऊन मी पोलिस स्टेशनवर गेले. आम्ही गेलो तेव्हा मधू समोरच बसलेला होता. ओढलेल्या त्रस्त चेहऱ्याने. चेहऱ्यावर एक प्रकारचा भकासपणा आला होता. आम्ही दिसताच त्यानं दोन्ही हातांनी तोंड झाकलं. अडखळत तुटक शब्दात मला कळलं, " रस्त्यातल्या खड्डयात मोटारीचं चाक एकदम गेलं–कितीही प्रयत्न केला तरी गाडी सरळच होईना, ती सरळ त्या मुलांच्या अंगावरच गेली–माझा अगदी नाईलाज

झाला–काही चालेना–काय करू, काय करू!" हाच अष्टाक्षरी मंत्र मधू पुटपुटत राह्यला. मी त्याचं खूप सांत्वन केलं, आमचे वकील म्हणजे मधूचे दोस्तच होते. त्यांनी पण त्याला खूप धीर दिला. बरेच प्रश्न विचारून त्यांनी त्याला बोलतं केलं. अखेरीस जामिनावर सोडवून मधूला घरी आणलं–

–पण घरी परत आलेला मधू अगदीच वेगळा झाला–पार बदलून गेला. डोक्यावर रुपेरी छटा दिसू लागली, डोळे इतके खोल गेले, डोळ्यांभोवती काळी वर्तुळं उमटली–आणि चेहरा भयंकरच काळवंडला. हाच का तो पूर्वीचा मधू असा संभ्रम पडू लागला. ती दोन्ही मुलं हॉस्पिटलात गेल्याचं कळलं तेव्हा तर मधू ओक्साबोक्शी रडला. स्वतःला क्षणोक्षणी दुषणे देऊ लागला. वकिलांच्या कौशल्याने मधू सुटला खरा पण तो खऱ्या जीवनातून मात्र उठलाच. कशाची गोडी-आवड त्याला राहिलीच नाही. रात्रीच्या रात्री तो जागून काढू लागला– अखंड सिगरेटी ओढीत. आमच्या दुकानाकडे तर तो ढुंकून पाहीना. अशामुळे माझेही अवसान गळाले आणि या सर्वांचा व्हायचा तोच परिणाम झाला. इतक्या वर्षांनी प्राप्त होणाऱ्या सुखाला मी मुकले–घरात मधू हा असा आणि मी अशी आजारी, दुःखी–माझ्या आईबाबांनी अपार श्रम करून आम्हाला वर काढले–असं तरी किती वेळ चालायचं असा विचार करून मीच माझं अवसान गोळा केलं आणि एक दिवस आमच्या दुकानाच्या फळ्या उघडल्या.

त्या दिवशी मी दुकानात गेले तो कॅशिअर व दोन तीन मोजके नोकर याखेरीज कुणीच दुकानात उरलं नव्हतं. इतक्या दिवसांत विक्री अगदीच घटली होती. कसेबसे या नोकरांचे पगार निघत होते विक्रीतून. काही हरकत नाही. मी अपार कष्ट करून या संकटातून मधूला व माझ्या संसाराला वर काढीनच काढीन या जिद्दीनं मी कामाला लागले. जातीनं दुकानाची देखरेख करू लागले. रोज नेमानं दुकानात बसू लागले. प्रसंगी विक्रेतीही बनले. हळूहळू माझ्या स्नेहाळ बोलण्यानं, गोड वाणीनं गिऱ्हाईकं परत आमच्या दुकानाकडे आवर्जून पावलं वळवू लागली. बराच धीर आला. पण ज्याच्याकरता मी हे सर्व कष्ट उपशीत होते–तो माझा मधू–त्याच्यात मात्र काहीही फरक पडत नव्हता. तो तसाच स्थितप्रज्ञासारखा बसून होता. पण आजकाल मी मोटार काढली की तो आत जाऊन बसे पण मागच्या सीटवर. त्या दिवसापासून त्याचा स्वतःवरचा विश्वासच उडाला होता. तो आत्मविश्वास त्याला परत कशा तऱ्हेने मिळवून देता येईल हाच मला अलीकडे ध्यास लागला होता. त्याच्या हातून त्या दोन उमलत्या कळ्यांचा नाश घडला, म्हणूनच दैवानं त्याचंही सुख हिरावून घेतलं असा त्याचा ग्रह झाला होता. अलीकडे दुकानच्या वाढत्या कामामुळे मलाही त्याच्या लहरी पूर्वीसारख्या सांभाळता येत नसत, त्यामुळे माझंही त्याच्यावरील प्रेम कमी झालं आहे, अशी एक खुळी कल्पना तो आजकाल बोलून दाखवीत असे. हे दुर्दैव माझं!



त्या दोन उगवत्या कळ्यांचा नाश घडला म्हणून ...

एक दिवस आम्ही दुकानाच्या फळ्या उघडत होतो तोच एका छोट्या मुलाच्या रडण्याचा आवाज आला. मी आवाजाच्या दिशेनं बघितलं तो समोरच्या घरातील ५।६ वर्षांचा मुलगा रडत होता. आमच्या दुकानाकडे बोट दाखवून तो काहीतरी वस्तू मागत होता. दुकानात तो व त्याचे वडील आले. त्याला फुगा हवा होता मोठ्ठा आभाळाएवढा. मी त्याला चांगले ५।६ फुगे दिले तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर उमललेलं ते तोंडभर हसू पाहून सगळं दुकान प्रकाशल्याचा मला भास झाला अन मग हा रोजचा पायंडाच पडला—मन मानेल तेव्हा तो येई, तोंडभर हसे व चालू लागे. त्याचे वडील पण बरेच वेळा त्याचेबरोबर येत. परिचय, ओळख या मैत्रीच्या पायऱ्या आम्ही भरभर ओलांडल्या व एकमेकांच्या सुखदुःखाशी केव्हा येऊन पोहोचलो हे कळलंच नाही. त्यांची पत्नी नुकतीच गेली होती, त्यामुळे मुलाचा सर्व भार त्यांच्यावरच पडला होता. तरीपण या सर्व संकटाशी त्यांनी ज्या धैर्यानं झुंज चालवली होती ती पाहून मी नकळत त्यांची मधूशी तुलना करू लागले— मनातल्या मनात—मधू अलीकडे आपलं दुःख दारूच्या पेल्यात बुडवू पहात होता. दुकानातील स्वतःच्या खोलीत तो नुसता धुंद होऊन बसून रहात असे. मी रिकाम्या मनानं सगळी जरुरीची नित्यकर्मं यंत्रासारखी करीत असे. फक्त मधूत फरक एवढाच

पडला होता की त्याचं अनिलशी खूप सूत जमलं होतं—पण फक्त अनिलशीच—त्याच्या वडिलांना तो मुद्दामच टाळीत असे. मधू अनिलशी खूप खेळे. एके दिवशी अनिल असाच सकाळपासून दुकानातच होता. तो दमून मग मधूच्याच खोलीत झोपला असताना मधू मला म्हणाला, "सुले, अनिलची एवढी आबाळ होत आहे तर दिवसा आपण आपल्याकडेच त्याला ठेवून घेत जाऊ या का?" मी कठोर स्वरात म्हटलं, "हं. म्हणून तू आताशा कमी पितोस होय? तुला काय वाटलं असं सहजासहजी मूल मिळणार आहे होय."

"तुला काय म्हणायचं आहे सुलू? मी बाप होण्यास नालायक आहे असंच का?"

"हं! मला एवढंच म्हणायचं आहे की, तुझ्या ह्या वागण्याचा मला अतिशय त्रास होत आहे. तू तुला सावरायच्या प्रयत्नाला कधी लागणार आहेस? झालं ते झालं— ते काही आपण आता बदलू शकत नाही. मी झाल्या गोष्टीबद्दल तुला कधीच दोष दिला नव्हता. मी तुला दोष एवढ्याकरताच देते की, तू आपलं आयुष्य, आपलं सहजीवन—सगळं सगळं बरबाद करून टाकलंस—तुला धैर्य धरलं पाहिजे. कधीतरी—" शेवटी शेवटी माझ्या मुखातून शब्दच बाहेर पडेना—मधू उठून आतल्या खोलीत गेला—एवढ्यात कोपऱ्यात देशमुखांची गाडी दिसली—बरं झालं—मनाला दुसरीकडे वळवता आलं. ते गाडीचं इंजिन चालूच ठेवून घाईघाईनं दुकानाच्या पायऱ्या चढून वर आले. आम्ही एकमेकांकडे बघत होतो. त्यांच्याविषयीच्या माझ्या भावना मला आताशा उमजेनाशाच झाल्या होत्या. मधू व ते दोघातील फरक पदोपदी मला जाणवू लागला होता. आताही मला तसाच काहीसा मोह पडला. ते आल्या आल्या म्हणाले, "चल, तो असेलच ना आत, शुद्धीवर असला तर जरा बाहेर जाऊन येऊ या— का दारूच्या धुंदीतच आहे?" मधू आतल्या खोलीतून बाहेर केव्हा आला हे आम्हाला समजलंच नाही. "नाही नाही, मी दारूच्या धुंदीत नाही,



माझी धुंदी आता उडाली आहे. मि. देशमुख, सुलूसारखी स्त्री बघितल्यावर मलाही तुमच्यासारखंच वाटलं असतं—मीच तिला तुमच्याबरोबर जायची मोकळीक देत आहे. तुम्हा दोघांची मनं मला कळून चुकली आहेत. जा सुलू खुशाल— नालायक नवऱ्याबरोबर कशाला रहातेस ? तुझं जीवन जगण्याचा तुलाही हक्क आहेच. "

"नाही नाही, मला कुठंही जायचं नाही ? हे तुम्ही दोघांनी काय चालवलं आहे ?" एवढं मी बोलते तोच देशमुखांचं ओरडणं ऐकू आलं, " अनिल गाडी-पासून बाजूला हो—" आम्ही तिघंही दुकानाबाहेर धावलो पण तेवढयात अनिल गाडीत चढून बसला होता. गाडी चालूच ठेवली होती हे बोलण्याच्या भरात आमच्या लक्षातच राह्यलं नव्हतं. गाडी चालू झाली होती. आई ग, आता अनिलचं काय होणार ! गाडी वेग घेणार— देवा, देवा— मी गच्च डोळे मिटून देवाची प्रार्थना करू लागले— तोच मधूचं ओरडणं कानावर आलं. आता आणखी काय वाढून आणलंस देवा ! असं म्हणत मी डोळे उघडले— काय आश्चर्य— गाडी थांबली होती आणि अनिलला कडेवर घेऊन मधू गाडीतून उतरत होता— अतिशय चपळाईनं मधूनं गाडीत प्रवेश करून अनिलच्या हातचं चाक धरलं होतं. केवढा मोठा अनर्थ टळला होता. मधूनं अनिलला त्याच्या वडिलांजवळ दिला आणि तो माझ्याजवळ आला. दोघांच्याही डोळयांतून आसवं ओघळत होती. अनिल म्हणत होता, " मला पण बाबांसारखी गाडी चालवता येते ना मावशी ?" पण त्याच्या बोलण्याकडे आमचं लक्षच नव्हतं. देशमुख मधूकडे पहात म्हणाले, " सुलूसारख्या स्त्रीला मला वाटतं तुमच्यासारखा शूर पतीच हवा, मधुकरराव— माझी चूक झाली— मला इथं राहण्याचा काही हक्क नाही— जातो मी. " खालमानेने देशमुख पायऱ्या उतरून गेले. मी मधूच्या हातात हात गुंफत म्हटलं, " गुडबाय देशमुख. " ते गेल्यावर मधू म्हणाला, " खरंच सुलू, हेच हवं होतं का तुला ?" मी अश्रूभरल्या डोळयांनी म्हटलं, " दुसरं काहीच आणि कधीच नको होतं मला मधू ! मला माझा पूर्वीचा मधूच फक्त हवा होता. "

परत कधी मी गाडी चालवू शकेन याचा मला विश्वासच वाटत नव्हता—पण नाही, आज माझा आत्मविश्वास मला परत मिळाला— आता मी इकडचा डोंगर तिकडेमुद्धा करू शकेन— अनिल आता हातातून सुटतो हे बघताच माझ्या डोळयां-पुढे ती दोन छोटी मुलं आली आणि मी तीरासारखा धावलो— मी कधीच कमी नव्हतो. सुलू, कधीच कमी नव्हतो—

O

**तुम्हाला आमच्याशी सरळसरळ एकत्र बसून बोलणी करायची इच्छा नसेल तर आम्ही आज ज्या ठिकाणी आहोत तेथून इंचभरही मागे येणार नाही, हे लक्षात ठेवा.**

**–मोशे दायान**

५ जूनची पहाट झाली. निगेव्हच्या वाळवंटात इस्रायलचा तोफखाना धडाडू लागला. मध्यपूर्वेत पुनश्च रणांगण पेटले होते. युद्ध टाळण्यात संयुक्त राष्ट्र-संघाची शांतिसेना असमर्थ ठरली होती. आगीचा डोंब उसळण्याची शक्यता दिसताच आंतरराष्ट्रीय बंबवालेच पळून गेले होते.

संयुक्त अरब प्रजासत्ताकाला या वेळी हा धक्का नव्हता. कुठल्याही क्षणी युद्ध सुरू होईल हे नासरला ठाऊक होते. इस्रायलने ५ जूनला लढाई सुरू केली असली तरी नासरने २३ मेलाच युद्ध पुकारल्यासारखे होते. संयुक्त राष्ट्रांची शांतिसेना सरहद्दीवरून काढून लावली होती. २६ मेला नासरने भाषणात सांगितले होते –

“ मी एकदा म्हणालो होतो की आपली सिद्धता होताच, अर्ध्या तासात ‘युनेफ’ सेना मी हाकलून देईन. हेच आता प्रत्यक्ष घडले आहे. शार्म–एल्–शेख ताब्यात घेतले याचा अर्थच इस्रायलशी मुकाबला सुरूच झाला—Now the war will be general and our aim–the distruction of Israel—सर्वव्यापी युद्धच आता सुरू होईल. आमचे उद्दिष्ट एकच राहील – इस्रायलचा संपूर्ण नाश. ”

सिनायमध्ये १,००,००० अरब सैन्य १००० रणगाड्यांसह इस्रायलकडून तोफखाना सुरू होण्याची जणू वाटच पहात होते. पहाटेपासून तोफखाना धडाडू लागला व सकाळी ८–१५ वाजता इस्रायली सेनेने तीन दिशांनी मुसंडी मारली. इस्रायलने ब्रिटिश बनावटीचे सेंच्युरियॉन रणगाडे व अमेरिकन बनावटीचे सुपर शेरमन रणगाडे पैदा केलेले होते. या रणगाड्यांच्या लाटांमागून लाटा, गाझा पट्टीची सरहद्द ओलांडून, स्वयंचलित सैन्यासह अंतर कापू लागल्या.

रेडिओवरून मोशे दायानचा आवाज सर्वांना ऐकू येत होता. दायान सैनिकांशी बोलत होता–

# युद्धाकडून युद्धाकडे

रा. म. शास्त्री । लेखांक सहा

" इस्रायली सैनिक हो...ते संख्येने अधिक आहेत परंतु आपण त्यांचा समाचार घेऊ. आपले राष्ट्र लहान आहे, पण आपला निश्चय पक्का आहे. शांतता आम्हाला हवी आहे परंतु आपल्या प्राणांकरिता व देशाकरता आपल्याला लढावे लागत आहे– On this day our hopes and our security are with you––आज या क्षणी आमच्या आशा–आकांक्षा व आमची सुरक्षितता ही तुमच्या हाती आहे."

परंतु या अरब–इस्रायली युद्धाचे पहिले काही तास, हे मुलकी चढाईच्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे नव्हते. यशाची सगळी मदार इस्रायलच्या वायुदलावर होती. यापूर्वी कित्येक आठवडे इस्रायलच्या वैमानिकांनी इजिप्तच्या प्रदेशावर टेहळणी करून, बॉम्बवर्षावाचा आराखडा पक्का केला होता. इजिप्तच्या वैमानिकांच्या विश्रांतीच्या वेळा कोणत्या, त्यांच्या पाळ्या केव्हा बदलतात याची बित्तंबातमी त्यांनी काढली होती.

इस्रायली विमानांनी पहाटेच आकाशात झेपा घेतल्या होत्या. तेल आव्हिव्हच्या नागरिकांनी पहाटेच विमानतळावरून सतत सुरू झालेली घरघर ऐकली होती. 'मायरेज' व मायस्टर जेट विमाने घरघराट करीत सकाळीच भूमध्य समुद्राच्या दिशेने झेपा घेत गेली आणि मग राजधानी शांत झाली होती. सारे इस्रायलच शांत होते.

इजिप्तमध्ये मात्र सगळा गोंधळ माजला होता. इस्रायली विमानांनी धुमाकूळ घातला होता.

इस्मालिया हे सुएजच्या पश्चिम किनाऱ्यावरचे शहर. या शहरानजिकच्या इजिप्तच्या विमानतळावर इजिप्तची मिग विमाने वैमानिकांची वाट पहात खोळंबलेली होती. वैमानिकांची कॉफी–पानाची ती वेळ होती. विमानतळावरील उपहारगृहात

वैमानिकांचे कॉफी–पान चालू असतानाच हाहाःकार उडाला. इस्रायली जेट विमाने रोरांवत झेपावत खालवर आली. सर्व दिशांनी आली आणि तेथील सर्व विमानांचा विमानतळावरच त्यांनी बॉम्बफेकीने संपूर्ण संहार केला ! विमानतळावरच या रशियन जेट विमानांचा इस्रायलच्या वायुदलाने खातमा केला.

सिनायच्या द्विपकल्पातील, इस्रायल सरहद्दीजवळचे सहा इजिप्ती विमानतळ, हे तर इस्रायली विमानांचे खास भक्ष्य ठरले. अल् अरिश, बिर गिफगफा, हे उत्तर सिनायमधील विमानतळ व रास–सुद्र, एल्–तोर व रास–उम–सिद्व, हे सिनायच्या किनाऱ्यालगतचे विमानतळ पहिल्या काही तासांतच, विमानतळावरील सर्व विमानां-सह उद्ध्वस्त करण्यात इस्रायली वैमानिकांनी यश मिळवले.

इस्रायली वैमानिकांनी या सर्व शिकारी अचूक साधल्या, कारण त्यांनी सुरक्षित उंचीवरून ही बॉम्बफेक केली नव्हती ! जीव धोक्यात घालून वैमानिक हळूहळू अगदी खालवर झेप घेत, व इजिप्तच्या विमानतळावरील विमाने व 'रडार-स्टेशने ते टिपून टिपून निकामी करीत होते.

नासरने मिळवलेली मोठमोठी बॉम्बर विमाने, नाईलच्या किनारी आस्वान धरणाच्या परिसरात लुक्झोर विमानअड्ड्यावर ठेवलेली होती. इतक्या आतवर ती सुरक्षित आहेत असा त्याचा समज होता. परंतु इस्रायली वैमानिकांनी दमास्कस-पासून लुक्झोरपर्यंत थैमान घातले; व इस्रायलवरचे आकाश निर्वेध करून टाकले. जॉर्डनमधील अम्मानचा विमानतळ व एल्–मफ्राकचा विमानतळ हे होते की नव्हते झाले. इराकपर्यंत घुसून, इराकी विमानांना इस्रायली वैमानिकांनी विमानतळावरच गाठले. इतक्या लवकर आपल्यापर्यंत इस्रायलची विमाने येतील, याची इराकी अधि-काऱ्यांना कल्पनाच नव्हती. या पहिल्या काही तासातच इजिप्तची ३००, सिरियाची ६०, जॉर्डनची ३५ व इराकची १५ विमाने इस्रायलने नष्ट करून टाकली.

सर्व युद्धभूमीवरील आकाशाचा कबजा इस्रायली वायुदलाने करताच,– अरबांचे कंबरडेच मोडले.

जॉर्डनचा विदूषकी राजा हुसेन याने तर हायच खाल्ली. ज्याअर्थी एवढ्या संख्येने विमाने अम्मानवर आली त्याअर्थी ती अमेरिकन विमाने, अमेरिकेच्या विमानवाहू बोटीवरून आलेली असावीत, असा तर्क करून त्याने गोंधळ उडवून दिला. त्याने अम्मानमधील अमेरिकन वकिलाला–फिन्ले बर्न्स–याला बोलावून विचारले – "याचा अर्थ काय ?"

बर्न्स बिचारा गडबडला. त्याने वॉशिंग्टनला फोन लावला. वॉशिंग्टनहून खुलासा आला–' विमाने अमेरिकेची नाहीत. ' हा खुलासा यायला दोन तास लागले.

या मधल्या वेळात राजे हुसेन स्वस्थ बसले की काय ? त्यांनी एवढी हाय खाल्ली होती, की 'तोबा'–'तोबा' म्हणत त्याने नासरशहाला फोन केला. हुसेन यांना कल्पना नव्हती की उजाडता उजाडता इजिप्तच्या विमानांचा निःपात करून

इस्रायली विमाने झुंडीने अम्मानवर कोसळली होती.

राजे हुसेन यांनी नासरशहाला फोन लावल्याची वर्दी इस्रायली इंटेलिजन्सला मिळाली व संभाषण सुरू होण्यापूर्वी इस्रायली टेप–रेकॉर्डर, सज्ज राहिला होता. संभाषण सुरू झाले —

"हॅलोऽऽव, राजे तयार आहेत ना? इतक्यात अध्यक्ष फोनवर येतीलच."

"अम्मानहून बोलतो आहोत! अध्यक्ष तयार आहेत का?"

"आले–आले . . . ! अध्यक्षच बोलत आहेत."

"कसं काय ठीक आहे ना? सर्व आघाडयांवर युद्धाची वार्ता ठीक आहे ना . . हेच राजेसाहेबांना विचारायचं आहे.– आता राजेसाहेबांशी बोला."

ऑपरेटरने संभाषण चालू करून दिले. मधला काही भाग अस्पष्ट होता. नंतरचा पुढीलप्रमाणे रेकॉर्डरवर आला.

नासर :– आपण फक्त अमेरिकेचे नाव घ्यायचे की इंग्लंड – आणि अमेरिका दोघांचे?



हुसेन :– अमेरिका आणि इंग्लंड.

नासर :– पण ब्रिटनपाशी भूमध्य समुद्रात विमानवाहू जहाजे आहेत का ?

हुसेन :– (अस्पष्ट शब्द.)

नासर :– ठीक आहे. राजे हुसेन, तुम्ही एक निवेदन प्रसिद्ध करा. मी घोषणा करतो. ऐकू येतंय ना ? हॅलो ऽऽव. गुडमॉर्निंग. मला ठीक ऐकू येतंय . . .

हुसेन :– मिस्टर प्रेसिडेंट . . . लढाईचे वृत्त काय ? काही कल्पना . . .

नासर : – आपण सर्व शक्तीनिशी लढत आहोत. प्रत्येक आघाडीवर रात्रभर युद्ध चालू आहे. काही अडचणी आल्या असल्या तरी त्यावर मात करून आम्ही लढत आहोत. परमेश्वर आपल्या बाजूला आहे. ठरल्याप्रमाणे आपण दोघांनी निवेदने काढू. सिरियन सरकार असेच निवेदन काढायला तयार आहे का ते आम्ही पहातो.

हुसेन :– अच्छा. ठीक आहे.

नासर :– डरू नका. आम्ही तुमच्याबरोबर आहोत. आमची विमाने आज इस्रायलवर जातील. सकाळपासून इस्रायली विमानतळावर आपली बॉम्ब फेक सुरू आहे.

हुसेन :– आभार. आभार.

दुसऱ्या दिवशी नासर व राजे हुसेन यांनी इंग्लंड, अमेरिकेवर आरोप केला– "तुमची विमाने इस्रायलच्या वतीने आमच्या तळावर बॉम्बफेक करीत आहेत."

गाझा पट्टीत सुरू झालेली चढाई वायुदलाच्या मदतीशिवाय धुमधडाक्याने आगेकूच करीत होती. मुख्य सैन्याचे गाझा पट्टीत शिरताच दोन विभाग झाले. एक सैन्य विभाग भूमध्य समुद्राच्या किनाऱ्याने अल–अरिशकडे वळला तर दुसरा गाझा पट्टीत खिंडारे पाडीत इजिप्ती सैनिकांची कोंडी करीत पुढे सरकू लागला. १०,००० इजिप्ती सैन्य गाझा पट्टीत कोंडले गेले. पॅलेस्टाईन अरबांच्या गढ्या लढत होत्या. इस्रायली सैनिकांनी त्यांच्यावर हल्ले चढवण्याचे सोडून फक्त त्यांची कोंडी करून ते त्यांना निष्प्रभ करीत राहिले.


## १ महिन्यांत वायरमन कोर्स

रविवारचे व ६ महिन्याचे मासिक १० रु. फी असलेले–वेगवेगळे वर्ग. पाळी बदलणाऱ्यांना सोईस्कर अशा वेळा. मराठी, हिंदी व इंग्रजीतून वेगवेगळ्या बॅचेस. इलेक्ट्रिशियन, सुपरवायझर, वाईंडिंग व रेडिओ रिपेअरिंगचे वेगळे वर्ग, प्रॅक्टिकलसह शिक्षण. प्रत्यक महिन्याच्या २, ११ व २२ तारखेस नव्या बॅचेस.

भेटा :—सकाळी ७ ते रात्री ८. अगर लिहा :—

**दादर इलेक्ट्रिक इन्स्टिटय़ूट**

**पोर्तुगीज चर्चशेजारी, ' १६५ ' बस स्टॉपसमोर, दादर [ वे.रे. ], मुंबई २८**

अरब निर्वासितांचा नेता सुकैरू निसटला. जेरूसलेम अम्मान-दमास्कस बैरूत मार्गे तो पळाला. अदृश्य झाला-

सिनायमध्ये ९०० रणगाडे नासरने पाठवलेले होते. हे सर्व रणगाडे इस्रायली सरहद्दीवर आणण्यात अरबांनी मोठी चूक केली. कारण अरबांची फळी फोडून इस्रायली सेना या भगदाडातून या रणगाड्यांच्या पिछाडीवर आली. मागे हटण्याचा मार्गच बंद झाला. मोहीम संपण्यापूर्वीच या वेळी ७०० रणगाडे सुस्थितीत इस्रायलच्या हाती पडले !

सुएज ते मध्यसिनायमधील मिटला खिंडीपर्यंतच्या रस्त्यावर इजिप्तच्या सैन्याच्या वाहनांचा चक्काचूर झालेला होता. टँक्स, ट्रक्स, जीप गाड्या यांच्यावर इस्रायली विमानांनी एवढा प्रचंड भडीमार केला होता, की या सर्व वाहनांची मोडतोड होऊन सबंध रस्ता या वाहनांच्या सुट्या भागांनी वहातुकीला बंद झाला होता. वाहनांचे जळालेले भाग, दूर उडालेले पत्रे, घरंगळत गेलेले टायर्स, लोखंडी भागांची गठळी, असा सगळा बैदा झाला होता. रणगाड्यांवर चढवलेल्या तोफांत भरलेले गोळे उडवण्यापूर्वीच हा हल्ला झाल्याने त्याच अवस्थेत या रणगाड्यांवरील तोफांच्या नळकांड्या, माना मोडून पडलेल्या होत्या. किती हानी झाली त्याला गणतीच नव्हती.

जेरुसलेम शहरात प्रत्यक्ष युद्धाला सोमवारी म्हणजे ५ जूनलाच तोंड लागले. परंतू आदल्या दिवशी रविवारीच झगडा उडण्याची शक्यता निर्माण झालेली होती. एका इस्रायली विमानावर जॉर्डनच्या ताब्यातील जेरुसलेम शहराच्या भागातून विमान विरोधी तोफांचा मारा करण्यात आला. हे विमान टेहळणी करीत होते; व फोटो घेत होते. असा आरोप अम्मान रेडिओने केला. हा तोफांचा गडगडाट इस्रायलच्या ताब्यांतील जेरूसलेम मधून राहाणाऱ्या, गजबजलेल्या जाफारोडवरून प्रतिध्वनी उमटवीत गेला, व इस्रायली नागरिक विमान हल्ला झाला या कल्पनेने, आडोशाला पळाले. ती सर्व रात्र भीतीग्रस्त वातावरणातच गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी, उत्तर व दक्षिण सिनायमध्ये चढाई सुरू झाल्यानंतर तीन तासांनी, जॉर्डनकडील पूर्वेची आघाडीही धडाडू लागली. इस्रायलने जॉर्डनला सांगितले होते की, जर तुम्ही इस्रायलच्या वतीने युद्धात आला नाहीत, तर आम्हीही तुमच्यावर हल्ला करणार नाही. परंतु जॉर्डेनियन सैन्याने इस्रायलव्याप्त जेरुसलेमवर तोफांचा माराच सुरू केला. मॉर्टर व मशिनगन्सचा माराही त्यातच मिसळला. इस्रायलव्याप्त जेरुसलेममधील ६०० घरे या माऱ्याच्या टप्प्यात सापडली. पंतप्रधान एशकॉल यांच्या घराजवळ काडतुसे येऊन थडकली. इस्रायलने बांधलेले वस्तुसंग्रहालय उद्ध्वस्त झाले. जिथे येशूने आपले अखेरचे भोजन घेतले असे पुराणे सांगतात ते चर्च या हल्ल्यात सापडले.

१-३० वाजता जॉर्डेनियन सैन्य, संयुक्त राष्ट्रांनी निर्लष्करी केलेला भाग ताब्यात घेऊन पुढे सरकले. जॉर्डेनियन सैन्याची सूत्रे इजिप्ती सेनाधिकारी जनरल

अब्दुल रियाद याच्याकडे दिलेली होती. अम्मान रेडिओवरून राजे हुसेन सैन्याला उद्देशून सांगत होते—

" या लढाईवर आपले सारे भवितव्य अवलंबून आहे. अंतिम विजय देणाऱ्या या लढाईची आता कुठे सुरुवात झाली आहे. एकतर आपण सन्मानाने जगू, वा मानाने मरू !"

इस्रायलव्याप्त जेरुसलेम शहरावर हे जीवनमरणाचे संकट कोसळले असताना शहराचा महापौर थिआडोर कोलेक हा आपल्या सेडान गाडीतून शहराच्या प्रत्येक भागातून लोकांना धीर देत फिरत होता. एका ठिकाणी थोडीशी उघडी जागा होती; व जॉर्डेनियन मारा सुरू होता. गोळ्या सुसाटत जात होत्या. ड्रायव्हरने मोटार थांबवली व त्याने कोलेकच्या तोंडाकडे पाहिले.

" थांबू नकोस. जर आपली मरणघटका आली असेल तर येऊ दे—पुढे हो !"

ड्रायव्हरने मोटार चालूच ठेवली. मोटारच्या मागच्या भागात एक गोळी घुसली. परंतु महापौर आपल्या स्वतःच्या जिवाची काळजी करीत मागे हटले नाहीत. असे महापौर लाभलेले शहर जॉर्डेनियन सेनेच्या हाती पडेलच कसे ? अमेरिकेतील सुप्रसिद्ध ' लाईफ ' या नियतकालिकाचा छायाचित्रकार पॉल शुत्सर हा या गोळीबारात ठार झाला. तो मूळचा ज्यू होता. झिओनिस्ट चळवळीचा एक सभासद होता. त्याच्या डोक्यात गोळी शिरून तो ठार झाला होता.

दुपारपर्यंत जॉर्डेनियन तोफांनी हा धुमाकूळ घातला. दुपार वर चढू लागताच इस्रायलने प्रतिहल्ला चढवला. निर्लष्करी टापूचा कबजा केलेल्या जॉर्डेनियन सेनेवर इस्रायल सैन्य तुटून पडले. हातघाईची लढाई झाली. ग्रेनेड—बंदुकांची द्वंद्वे झडली. अखेर जॉर्डन सेना पळाली. आता सायंकाळ झाली होती. दिवसभर इतरत्र गुंतलेले इस्रायलचे वायुदल, आता जेरुसलेमच्या लढाईत भाग घेण्यासाठी मोकळे झाले होते. रात्रीच्या दाट काळोखात सोमवारीच रात्री इस्रायलच्या विमानांनी जॉर्डनव्याप्त जेरुसलेमवर बॉम्बवर्षाव सुरू केला. आकाश झळाळून उठले. जॉर्डन जेरुसलेममध्ये ती रात्र अपार हानीची ठरली.

मंगळवारी पहाट होताच, इस्रायली सेनेचे दोन जबडे उघडले गेले. एक पूर्वेच्या दिशेने निघाला, व दुसरा दक्षिणेकडून पुढे सरकला. या भागात लहान—लहान टेकाडे होती. हे प्रत्येक टेकाड, हातघाईच्या लढाईनंतर इस्रायली सेनेने कबजात घेतले. बुधवारी सकाळी जॉर्डन सेनेने शस्त्र टाकले. जॉर्डनव्याप्त जेरुसलेमसह सर्व शहराचा कबजा इस्रायलकडे आला.

इस्रायलने सर्व शहरवासियांना रेडिओद्वारा कळवले— " सर्व नागरिकांनी घरातच रहावे. कुणी बाहेर डोकावेल तरी गोळ्या घातल्या जातील. ही आज्ञा सर्वांना कळली आहे, हे आम्हाला कळावे यासाठी घराबाहेर—खिडक्यांतून पांढरी निशाणे अडकवून ठेवा."

इस्रायली रणगाडे शहरातून फिरू लागले. जुन्या जेरुसलेममध्ये घुसताना तोफांचा वापर करू नका, व जुनी स्मारके पडतील असे काही करू नका अशी सक्त ताकीद इस्रायली सेनेला मिळालेली होती. ज्या शहराच्या स्मृती ज्यू पुराणातून विपूल पसरलेल्या आहेत, त्या शहरात विजेते म्हणून प्रवेश करताना इस्रायली सेनेचा उत्साह व आनंद शतगुणीत झालेला होता. हा मँडेलबम दरवाजा, ही गार्डन ऑफ जेन्थेसमन, इथून येशू सूळ खांद्यावर घेऊन असा या मार्गाने गेला, प्रत्येकजण एक-मेकांना माहिती देत पुढे सरकत होते. हातात संगिनी होत्या. आसपास विव्हळ-णाऱ्या मरणासन्न अरब सैनिकांकडे कुणाचेच लक्ष जात नव्हते. रस्त्याच्या मध्यभागी, गटारात, जळालेल्या वाहनांतून अरब प्रेते पडलेली होती.

दहा वाजता ओमर मशीद, या मशिदीच्या वास्तुपाशी इस्रायली सैन्य पोचले. या मशिदीच्या सोनेरी घुमटावर चढून–'स्टार ऑफ डेव्हिड 'हे इस्रायली निशाण फडक-वण्यात आले. समोरच दु:खी भिंत होती. सर्वजण त्या दिशेने धावत होते.

या विभागात फारशी लढाई जॉर्डनने केलीच नाही. सर्व भाग जवळजवळ सुस्थितीत होता. पाच–एक मिनिटातच जॉर्डन अरबांचे शिष्टमंडळ भेटायला आले. त्यांत अरब गव्हर्नर होता. त्यांनी विनंती केली... " आता गोळ्या झाडू नका. शहराचा तावा घ्या. "

दु:खी भिंत ही जुन्या ज्यू–प्रार्थनामंदिराचा अवशेष असल्याने, तेथे मोठा प्रार्थना-समारंभ लगेच आयोजित करण्यात आला. पंतप्रधान एशकॉल व संरक्षणमंत्री मोशे दायान हे दोघे या प्रार्थनेत भाग घेण्यासाठी तातडीने आले. पूजास्थानांच्या पावित्र्यासाठी, जीवाच्या आकांताने सेना लढू शकते, ही धर्मश्रद्धा नागरिकांच्या आणि सैनिकांच्या जीवनात खोल रुजलेली असते. इतिहासात मूळ धरलेल्या अशा श्रद्धांचे सामर्थ्य विलक्षण असते. सर्वसाधारण जनमानसात निधर्मीमूल्ये प्रतिध्वनी निर्माण करू शकत नाहीत. या चेतनाशून्य मूल्यांची बडबड करणारे नेतृत्व, हे सतत


क्र. ३९ मध्ये **रु. ४१,०००** जिंकाच !

**प्रवेश–पत्रिका केसरी व सोबतमध्ये दि. २२–९–६८ रोजी प्रसिद्ध झाली.**

**मुंबई, कोल्हापूर, सांगली, बेळगांव, पुणे व महाराष्ट्रांत ठिकठिकाणी एजन्टस आहेत. लिट्‌क्विझ वीक्लीचा नवीन अंक मोफत मागवा:—**

**लिट्‌क्विझ प्रायवेट लिमिटेड, मुंबई ७**

१५ भाषेत ११० एजन्टस, २०० पत्रांत जाहिरात

मारच खाते. पुराणातली वांगी पचवून, अत्याधुनिक विज्ञानदृष्टी स्वीकारलेले इस्रायलचे नेतृत्व असे मारखाऊ ठरले नाही. एशकॉल व दायान सामान्य नागरिकांच्या उत्साहाने, श्रद्धेने आणि आनंदाने या शतकानुशतकांनंतर घडणाऱ्या प्रार्थना सोहळ्यात सामील झाले.

इस्रायली सेनेतील एक लढणारा धर्मगुरू–फादर गोरेन याने प्रार्थनेचे नेतृत्व केले. दाढी राखलेला हा वृद्ध तात्पुरत्या उभारलेल्या व्यासपीठावर चढला, तेव्हा आनंदाश्रूंनी भिजलेला होता. रोमांचामुळे कापणारा त्याचा गंभीर आवाज आसमंतात पसरू लागला......

" Trust in the Lord Israel, for he is thy strength and thy shield..."

प्रार्थना सुरू झाली. परमेश्वराचे आभार मानून झाल्यावर फादर गोरेनचे लहानसे प्रवचन सुरू झाले–

" परमेश्वराच्या या भूमीचा आपण कबजा केला आहे. मी सर्व ज्यू वंशाच्या वतीने जगताला आश्वासन देतो, की या नगराचा सांभाळ आम्ही करू, इथल्या पवित्र वास्तूंची काळजी घेऊ. सगळ्या जनतेची काळजी घेऊ. "

इस्रायलव्याप्त जेरुसलेम शहराच्या भागात ज्यू जनतेच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. बॉम्बहल्ल्यापासून बचाव करण्यासाठी बांधलेल्या आडोशातून आता सर्वजण रस्त्यावर आले होते. युद्धावर न गेलेली ही सर्व वृद्ध, पुरुष, स्त्रिया व मुले होती. इस्रायली सेना संचलन करीत शहरातून जात असताना, रस्त्याच्या दुतर्फा त्यांची झुंबड उडालेली होती. वृद्धांच्या मनात तरुणांविषयी आशंका होती, की ही पिढी पुरेशी धर्मश्रद्ध नाही. पुराणांविषयी उदासीन आहे. परंतु आज ही सर्व वृद्ध माणसे काहीशा चकित मुद्रेने पहात होती, की जुन्या जेरुसलेमच्या मुक्तीचा विलक्षण आनंददायक प्रत्यय देणाऱ्या घोषणा देत सैन्य जुन्या जेरुसलेमकडे निघालेले होते. इस्रायलच्या समंजस नेतृत्वाने घडवलेला हा चमत्कार होता.

जॉर्डन नदीचा पश्चिम किनारा कबजात घेण्यास, लगेच इस्रायली सेनेने सुरुवातच केली. बेथेलेम पडले. नाब्लुस पडले. बेथेलेमला तर ख्राईस्ट जन्मला होता. बुधवारी दुपारपर्यंत म्हणजे तीन दिवसांच्या अवधीनंतर घनघोर लढाईनंतर जॉर्डन सैन्याचा पूर्णपणे पराभव झाला होता. जॉर्डन नदीच्या पश्चिम काठावरील २००० चौरस मैलांच्या परिसरातून जॉर्डनची सत्ता संपुष्टात आली होती.

पकडलेल्या जॉर्डन सैनिकांची व्यवस्था लावण्यासाठी, आणि जिंकलेल्या जेरुसलेममध्ये शांतता राखण्यासाठी लष्करी गव्हर्नर चाईम हर्झोग याची नेमणूक झालेली होती. जॉर्डन सैनिकांसाठी काटेरी तारांच्या कुंपणाचे तुरुंग उभारण्यात आले होते. त्यावर पहारा देणाऱ्या इस्रायली सैनिकांची कामगिरी अवघड झाली होती. बाजूने जाणारे ट्रक मध्येच या तुरुंगाजवळ थांबत. कुणीतरी खाली उतरून पहारा देणाऱ्या

सैनिकांना सांगे–" मला १५ मिनिटे आत सोडा. हरामखोरांनी माझे दोन भाऊ १९४८ साली मारले आहेत. मला त्यांनी फटके मारलेले आहेत. हे पाठीवरचे व्रण पाहा. "

पहारा देणारा इस्रायली सैनिक सांगे–" जाऊ द्या. ते सगळे भ्याड आहेत. आता ते हुसेनचा बाप आणि नासरचा बाप उद्धरीत असतात. मोशे दायान–बेन गुरियानची स्तुती–स्तोत्रे गात असतात. "

इकडे जॉर्डन सैन्याची अशी वाताहात झाली तर दोन दिवसात दाढी न केलेले राजे हुसेन जनतेपुढे रडत होते–

" जॉर्डनचे १५,००० सुपुत्र कामी आले आहेत. इस्रायल प्रबळ ठरल्याने त्यांचा जय झाला आहे. मला आशा आहे की, जग आपण आपल्या मायभूमीच्या रक्षणार्थ केलेल्या प्रयत्नांची दखल घेईल. "

युद्धाच्या सुरुवातीलाच, एक तर आपण सन्मानाने जगू वा मानाने मरू, अशी न पेलणारी वाक्ये उच्चारलेल्या राजे हुसेन यांची ही फटफजिती अधिकच केविलवाणी भासत होती.

इस्रायलच्या तिसऱ्या आघाताची दिशा होती शार्म–एल–शेख. नैसर्गिक रचनेमुळे अकाबाच्या आखातावर हुकमत चालवणारे हे बऱ्याच उंचीवरचे शहर संयुक्त राष्ट्र सेनेला खाली करायला लावून, नासरने आखाताची पुनश्च नाकेबंदी केल्याने तर हे युद्ध सुरू झालेले. झडपेसरशी याचा कबजा करण्याची योजना दायानने आखली होती. फार मोठी लढाई शार्म–एल–शेखला द्यावी लागेल अशीच इस्रायलची अपेक्षा होती.

टॉर्पेडो नौकातून शार्म-एल-शेखच्या किनाऱ्यावर टेहेळे उतरणार होते. छत्रीधारी सैनिक पिछाडीला उतरून माघारीचा रस्ता बंद करणार होते परंतु सर्व तयारी फुकट गेली. नासरने दायानला चकवले. शार्म-एल-शेखला लढाई झालीच नाही! शांतपणे बुधवारी सकाळी १० वा. छत्रीधारी सैनिक उतरले. अरब शार्म-एल-शेख मोकळे करून उत्तरेकडे वाळवंटातून पळत सुटले होते.

सगळ्या सिनाय द्वीपकल्पातून अरब सैन्याच्या झुंडीच्या झुंडी, पश्चिमेच्या दिशेने तोंड करून सुएजकडे निघाल्या होत्या. या झुंडींच्या आणि कालव्याच्यामध्ये इस्रायली सैन्य पसरलेले होते. दिशाहीन झालेली पळत सुटलेली अरब सेना, प्रतिकारशून्य झाल्याने इस्रायलने त्यांना पळायला फावेशी आडकाठी केली नाही, तरी चकमकी थोड्याफार झाल्याच.

सुएजचा पूर्व भाग, सिनायमधील तिन्ही मोठे रस्ते यावर इस्रायलने कबजा बसवला होता. रशियन बनावटीची ९ मिसाईल्स जमिनीवरच सुस्थितीत इस्रायलच्या हाती पडली होती.

ब्रिगेडियर जनरल गाविश–दक्षिण सिनायमधील चढाईचा इस्रायली कमांडर

होता. त्याने अंदाज दिला. " ७००० ते १०,००० इजिप्ती सैनिक, या लढाईत ठार झाले आहेत. ३००० सैनिक आम्ही पकडलेले आहेत. २७५ इस्रायली सैन्य ठार झाले असून, आमचे सुमारे ८०० जखमी झाले आहेत. आमचे ६१ रणगाडे नाश पावले आहेत. इजिप्तच्या सुस्थितीतील हाती पडलेल्या रणगाड्यांची संख्या याच्या दहापट आहे. "

रास-सुदर येथील तेलाच्या खाणींना जाता जाता अरब सैन्याने आगी लावलेल्या होत्या. हजारो सैनिक पाण्याविना तडफडत वाळवंटात सैराबैरा भटकत होते. डोक्यावरून जाणाऱ्या इस्रायली विमानांना ते पकडून घेण्यासाठी हाकारे घालीत होते.

गुरुवारपर्यंतचा युद्धाचा हा वृत्तांत आहे. शुक्रवारी सकाळी इजिप्त व जॉर्डन या दोघांनी संयुक्त राष्ट्रांच्या युद्धबंदी विनंतीला कवटाळले, व सिनाय-जॉर्डनमधील आघाड्या त्या दिवशी दुपारी २।। वाजता पुनश्च थंड झाल्या.

आता सिरियाची कंबक्ती भरली होती !

गुरुवारपासून सिरियाने ज्यू वसाहतीवर तोफांचा भडीमार सुरू केला होता. या वसाहती खोलगट भागात असल्याने, नैसर्गिक उंचीवरून सिरियाला हे करता आले. चालू युद्धाला सर्वात जास्त कुणी जबाबदार असेल तर तो सिरिया होता. सिरियाच्या लष्करी माथेफिरू नेतृत्वानेच, इस्रायलविरुद्ध घुसखोरांचा उपद्रव सुरू करून नासरला चिथावले होते.

शुक्रवारी दुपारी, सेंच्युरियन रणगाड्यांची पथके पुढे घालून इस्रायली सैन्याने सिरियातील चढाई सुरू केली. सतत दोन्ही बाजूंनी गोळाबार सुरू होता. रक्त-रंगण मोठेच झाले. परंतु रात्र पडण्यापूर्वीच इस्रायली सेनेने सिरियाच्या फळीत खिंडारे पाडली. इस्रायली सेनेची सिरीयन भूमीवरील आघाडी पुढे सरकू लागली. त्याच दिवशी सिनाय व जॉर्डन आघाड्या थंड झाल्याने तिकडचे सैन्य सिरीयन आघाडीवर ओतायला दायानने सुरुवात केली. सिरीयन सरहद्दीवरचे उंचवटे पार करून इस्रायली सैन्य १५ मैल आत घुसले; व त्यांनी गॅलिली समुद्रावर (इस्रायल-मधील हा मृतसमुद्र आहे) वाकडी नजर टाकणारे गोलानचे पठार कबजात घेतले. एल-क्युनेत्रा हे खुष्कीच्या मार्गावरील महत्त्वाचे ठाणे सर केले. दमास्कस जिंक-ण्याच्या मार्गावरील हे महत्त्वाचे पाऊल होते.

दमास्कस धोक्यात येताच, सिरीयाचा मद उतरला. दोन-तीन दिवस युद्धबंदी-साठी घोळ घालून अखेर ११ जूनला रविवारी एल-क्युनेत्रा येथे संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिनिधीसमक्ष सिरीयाने युद्धबंदी पत्करली !

या सहा दिवसांच्या लढाईत फक्त ६७९ इस्रायली सैनिक ठार झाले, २५६३ जखमी झाले. ही संख्या लहान दिसली तरी २५,००,००० लोकसंख्येच्याच इस्रा-यलसारख्या देशाची ही हानी तशी मोठीच म्हटली पाहिजे.

इस्रायलचा सरसेनापती मेजर जनरल राबिन याने लढाईचा हिशेब दिला :

" इजिप्तच्या व जॉर्डनच्या सैन्याचा आम्ही पुरता बीमोड केला असून, सिरीयालाही धूळ चारली आहे. जॉर्डनच्या पश्चिम किनाऱ्यापासून तो सुवेझ कालव्यापर्यंतच्या सर्व भागावर आता आमचा कबजा आहे. "

युद्धबंदीचा घोळ गुरुवार–शुक्रवारी चालू असतानाच टेलिव्हिजनवर दिलेल्या मुलाखतीत संरक्षणमंत्री मोशे दायान याने इशारा दिला––

" जॉर्डनचा पश्चिम भाग, सर्व जेरुसलेम शहर आणि गाझा पट्टी आता इस्रायलने सोडता कामा नये. सुएज कालवा व अकाबाच्या आखातातून नौकानयनाला कुणी आडकाठी करणार नाही याची ग्वाही मिळाली पाहिजे. "

अरबांना उद्देशून त्याने रोखठोक ठणकावले–" तुम्हाला आमच्याशी सरळसरळ एकत्र बसून बोलणी करण्याची इच्छा नसेल तर आम्ही आज ज्या ठिकाणी आहोत तेथून इंचभरही मागे येणार नाही, हे लक्षात ठेवा. "

संयुक्त राष्ट्रसंघटनेचे पितळ उघडे पाडताना त्याने सांगितले–" संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने वा समझोत्याने जगातला एकही महत्त्वाचा प्रश्न सुटल्याचे मला तरी ठाऊक नाही ! "

परंतु संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने युद्धबंदी सर्वांनी पत्करल्यामुळे, प्रत्यक्ष आघाड्या थंडावल्या तरी युद्ध आता न्यूयॉर्कला गेले. इस्रायलने युद्ध जिंकले होते–तह जिंकणार की हरणार ते अजून ठरायचे होते.

(क्रमशः)


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य : साडेतीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### शब्दसृष्टीतली वाहती गटारे

काही रशियन शास्त्रज्ञांनी म्हणे असा हिशेब लावला आहे की, माणूस दररोज जागेपणाच्या काळात सुमारे सव्वातीन तास बोलत असतो, व तेवढ्या काळात तो तीस हजार शब्द बोलतो. आता हा हिशेब लावण्यासाठी निशारमल्हे शास्त्रज्ञांना जे प्रयोग करावे लागले ते त्यांनी हिंदुस्थानात न येता केले असतील तर या हिशेबाला आपल्या मते काहीच किंमत नाही. कारण माणूस किती बोलू शकतो याचा अंदाज जगातली दोन माणसे भेटल्याशिवाय येणे अगदी अशक्य आहे असे आपले ठाम मत आहे. त्यातले एक माणूस म्हणजे हिंदुस्थानातला कोठलाही राजकीय नेता, अन् दुसरे माणूस म्हणजे आमची ही. गप्प बसलेला राजकीय नेता अन् तोंड मिटलेली ही या दोन्ही गोष्टी माझ्या पहाण्यात आलेल्या नाहीत, तेव्हा आमचा राजकीय नेता जेमतेम तीन – सव्वातीन तास बोलतो अन् आमची ही मला रोज अवघे तीस हजार शब्द ऐकवते असे कोणी म्हटले तर मी त्याच्या अज्ञानाची कीवच करीन. शिवाय आणखी एक ग्यानबाची मेख आहेच. रशियन शास्त्रज्ञांनी लावलेला हिशेब जागेपणाचा आहे – पण झोपेतल्या बडबडीचे काय ?

### बेशुद्ध पडलेली निद्रादेवी

निद्रानाशाचा रोग लागलेल्या माणसाला झोप आणणारी एक उशी एका पाश्चिमात्य शास्त्रज्ञाने तयार केली आहे. या उशीत म्हणे लोहचुंबक असतो, तो माणसाच्या डोक्यातून बाहेर पडणाऱ्या विद्युत – लहरींना शांत करतो व त्या माणसाला झोप आणतो. केवढा हा खटाटोप ! त्यापेक्षा ही माणसे भाषणे ऐकायला का जात नाहीत ? भाषण ऐकूनही झोप नाही आली तर एखादी गाजलेली कादंबरी का नाही वाचीत ? आणि एवढे करूनही झोप लागली नाही तर डझनभर अॅकॅडमी अॅवॉर्ड

मिळालेला एखादा चित्रपट का पहात नाहीत ? अर्थात् मला यातल्या एकाही उपायाची जरुरी पडत नाही ही गोष्ट वेगळी. कारण माझ्याजवळ झोपेचा एक रामबाण उपाय आहे, अन् तो म्हणजे आमच्या हिचे ते ठराविक शब्द – “अहो, मी काय म्हणते ऐकलं का ?” बस् – पुढे ती काय काय म्हणाली, मुळात म्हणालीच की नाही, अन् म्हणाली असल्यास थेट उजाडेपर्यंत म्हणत राहिली की काय याचा आपल्याला अजून पत्ता लागलेला नाही.


## ताज्या बातम्यांचा सरकारी कारखाना

वर्तमानपत्री लेखन करणे हा अशिक्षित माणसाचा व्यवसाय आहे असे बर्नार्ड शॉने लिहिल्याचे वाचल्यापासून माझी खात्री झाली होती की, माझ्यासारख्या गांवढळाला उपजीविकेचे हे एकच साधन शक्य आहे. परंतु माणूस जितका जास्त गांवढळ तितका तो अधिक चांगला पत्रकार होऊ शकतो हा हिशेब मात्र मला ठाऊक नव्हता. लाल चीनमध्ये खास माओच्या आज्ञेवरून बऱ्याचशा वर्तमानपत्रांच्या संपादक–उपसंपादकांना हुसकून लावण्यात आले आहे व गिरणीतले मजूर ती वर्तमानपत्रे चालविण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. अर्थात् हुसकलेल्या अ (-माओ-) विचारी संपादकाच्या अग्रलेखापेक्षा कोठलाही चिनी मजूर अधिक (माओ) विचारपरिप्लुत संपादकीय लिहू शकेल यात संशय नाही. शिवाय वसल्या जागी ताज्या बातम्या तयार करण्याचे तंत्र कारखान्यात माल तयार करणाऱ्या गिरणबाबूला जसे जमेल तसे डुलक्या न घेणाऱ्या उपसंपादकालादेखील जमायचे नाही.

## स्वर्गातल्या माशा

मास्तर आणि मच्छर किंवा कारकून आणि किडा यांच्यात अधिक सुखी कोण हे सांगणे हल्ली तितकेसे सोपे राहिलेले नाही. कारण काही भाग्यवान गाई, म्हशी, कुत्रे, डुकरे आणि कोंबडचा एअर – कंडीशन्ड जागेत राहतात असे आपण अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टींच्या आधुनिक आवृत्तीत म्हणजेच रोजंच्या वर्तमानपत्रांत वाचतो. पण अरबी भाषेतही सापडणार नाही अशी एक अजब गोष्ट परवा वर्तमानपत्रात वाचली, व ती म्हणजे टोकिओच्या प्राणीसंग्रहालयात एक हजार निरनिराळ्या जातीच्या माशा व किडे यांच्यासाठी एक राखीव जागा बांधण्यासाठी ९० लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. पाहिलेत ? आता शाळामास्तर आणि सुरवंट यांच्यात अधिक भाग्यवान कोण हे विचारायला पाहिजे का ? यापुढे हिंदुस्थानात माशा मारीत बसणाऱ्या लोकांच्या छळाला कंटाळून प्रत्येक भारतीय माशी एअर–इंडियाचे तिकीट काढून जपानला उडत जाईल व या जपानी स्वर्गात स्थायिक होईल.

O



# पुस्तके

वि. शं. पारगावकर

बाळ गाडगीळ यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला विनोदी लेखांचा संग्रह. त्याचे नाव आहे ‘हसायचं नाही !’ बाळ गाडगीळ यांच्या विनोदी लेखांच्या पुस्तकाचे हे नाव खरोखर अर्थपूर्ण आहे. एका दृष्टीने हे विनोदी पुस्तक हातात देताना ते एका विशिष्ट वाचकाला जणू हे पुस्तक वाचताना ‘ हसायचं नाही ! ’ असे बजावीत आहेत. कारण विनोदी वाङ्मय वाचणारा आपल्याकडे जो एक वाचकवर्ग आहे त्याची नाडी अगदीच निराळी आहे. म्हणून ह्या विनोदी लेखन वाचणाऱ्या विनोदी वाचकाच्या विनोदाविषयीच्या कल्पनाही ढोबळ, ठोकळेबाज आणि परंपरागत आहेत ! विनोदी वाङ्मयाची परंपरा मराठीत फार मोठी नसतानादेखील !

आपल्याकडे विनोदाचा उगम झाला तो श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून. त्यांच्या विनोदाची एक विशिष्ट जात होती. त्यांच्या विनोदाचे परीघही मर्यादित होते. आणि असे असले तरी श्रीपाद कृष्णांच्या वाङ्मयातून केवळ विनोदाचा उगम झालेला असल्यामुळे त्याचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता नाही. श्रीपाद कृष्णांचे शिष्य राम गणेश गडकरी यांनी ही पताका पुढे चालविली. गडकऱ्यांच्या प्रकृतीत दोन तऱ्हेचा विनोद दिसतो. एक त्यांच्या नाटकातून आलेला आणि दुसरा बाळकराम मधून आलेला. तरी अस्सल, अभिजात विनोदाचे मानकरी म्हणून

## हंसायचं नाही !

## हे बजावून सांगणारा संग्रह

गडकऱ्यांचे नाव टिकणार नाही. पात्रांच्या व्यंगावर बेतलेला विनोद ( येथे मला शारीरिक व्यंग अभिप्रेत आहे ) गडकरी यांनी भावबंधनमध्ये आणला. तसेच अति-शयोक्तीची दोरी कानाची मर्यादा ओलांडून त्यांनी ताणलेली आढळते. त्यामुळे विनोदाच्या धनुष्यातून सुटलेला तीर नेम हरवून बसतो. जसा शारीरिक व्यंगावर आधारलेला विनोद एकीकडे एका व्यक्तीला घायाळ करतो तसाच इतरांना तो विकारी आनंदाचे हसू देतो. हे झाले पहिल्या प्रकारच्या विनोदाचे अपयश किंवा मर्यादित यश ! दुसऱ्या प्रकारच्या विनोदामध्ये अतिशयोक्तीचे हसू येते परंतु खरे समाधान मिळत नाही.

अर्थात मराठीमध्ये विनोदाच्या प्रवाहाचा प्रचंड विस्तार केला तो खऱ्या-खुऱ्या अर्थाने आचार्य अत्रे यांनी. आपल्या विनोदाने त्यांनी माणसांना अक्षरशः गडबडा लोळायला लावले. त्यांनी आपल्या विनोदाचे क्षेत्र इतक्या विविध तऱ्हेने विस्तारून टाकले आहे की, त्याच्या दर्शनाने मराठी मन स्तिमित होते. त्यांनी कवितेतून विनोद आणला, नाटकातून आणला, लेखातून, अग्रलेखातून, भाषणातून आणि हाव-भावातूनही अत्रे यांनी विनोद आणला. अत्रे हा विसाव्या शतकातील एक चालता बोलता विनोदच आहे.

परंतु एवढे म्हणूनदेखील अत्रे यांच्या विनोदाचे विश्लेषण करायला गेले तर त्यांच्या ऐन आमदानीतील विनोद हा अभिजात विनोद होता असे म्हणावे लागेल. पुढे अत्रे यांनी प्रतिभावंत विनोदी लेखकाची आपली भूमिका बदलली आणि नेते-पदाची भूमिका स्वीकारली, तेव्हापासून अत्रे यांच्या विनोदाचे रूपही बदलले. तेव्हा मोरारजी हरामखोर झाला, ह. रा. महाजनी हराम झाले आणि अत्रे यांच्या विनोदाची रया गेली. आज तर अत्रे यांच्या विनोदाला अत्यंत गलिच्छ आणि शिवराळपणाचे स्वरूप आलेले आहे. आणि आश्चर्य म्हणजे अत्रे यांच्या ही गोष्ट लक्षात न येण्याइतके ते या गोष्टीने भारले गेले आहेत. 'मी उभा आहे', 'साष्टांग नमस्कार', 'लग्नाची बेडी' 'तो मी नव्हेच'ही अत्रे यांच्या विनोदाने बहरलेली नाटके आहेत.

अत्रे यांच्यातील या अभिजात विनोदाचा आविष्कार चिं. वि. जोशी आणि

पु. ल. देशपांडे यांच्यामध्ये दिसतो. ‘ चिमणराव, ’ ‘ आणखी चिमणराव ’ तसेच ‘ खोगीर भरती ’, ‘ नस्ती उठाठेव ’, ‘ बटाटयाची चाळ ’ आणि ‘ तुझे आहे तुजपाशी ’ इत्यादी साहित्य अतिशय कसदार आणि तितकेच निर्मळ विनोदाने रसरसलेले आहे.

बाळ गाडगीळ यांच्या विनोदाची जात आणि धर्म याच पंथातील आहे. उलट गाडगीळ यांनी निरनिराळया प्रवृत्तींप्रमाणेच काही व्यक्तींवरही विनोदी लेखन केलेले आहे. परंतु अत्रे यांच्याप्रमाणे त्यांनी विनोदविषय झालेल्या आपल्या व्यक्तिचा ‘ मोरारजी ’, ‘ विनोबा ’ अथवा ‘ सदोबा ’ होऊ दिलेला नाही.

मला वाटते विनोदी लेखनाचा खरा निकष हाच आहे. व्यक्ती ही गुणदोषांचे मिश्रण असते. परंतु अनेक व्यक्ती अशा असतात की काहींमध्ये गुणांचा फाजील अतिरेक असतो तर काहीमध्ये दोषांचा. व्यक्तिना जडलेला हा एक रोगच असतो. अशा वेळी विनोदी लेखकाला आपल्या विनोदाच्या शस्त्राने या गुणदोषांवर शस्त्रक्रिया करावी लागते. आणि एखाद्या शल्यविशारदाप्रमाणेच विनोद विशारदाला हे जोखमीचे काम फार काळजीपूर्वक करावे लागते. बाळ गाडगीळ यांनी हे काम फार यशस्वी रितीने केलेले आहे.

‘ हसायचं नाही ’मध्ये त्यांनी ‘ गुरद्यॉव ! एक लोटांगण ’, ‘ मी भवभूति ’, ‘ मी नॉट ऑउट पाचशे ’, ‘ कातर वेळ एक हुरवणे ’, ‘ उडती सतरंजी ’, ‘ संपादक : एकच ’ ‘ पूज्य आबासाहेब यांस– ’ ‘ भुडुश्शो – गोड गोड बालगीतांविषयी थोर थोर विचार ’ असे नाजूक लेख विनोदाची पातळी अत्यंत तौलनिक ठेवून लिहिले आहेत. बाळ गाडगीळ यांचे या प्रकारचे लेख वाचताना पु. ल. देशपांडे यांनी दिलेल्या वस्तऱ्याच्या उपमेची आठवण होते. परंतु अशी उपमा गाडगीळांच्या या लेखांना द्यावीशी वाटत नाही. (हजामत गुळगुळीत तर व्हावी, परंतु जखम होऊ नये . वगैरे.) कारण गाडगीळ हे विनोदाचा वस्तरा चालवून व्यक्तीची हजामत करतात असे वाटत नाही. त्यांचे हे लेख वाचून फार तर असे म्हणावेसे वाटते की गाडगीळ आपले काम वस्तरा चालवून करीत नाहीत; तर त्या व्यक्तीपुढे केवळ अशा प्रकारचा आरसा धरतात की आरशात पडलेले स्वतःचे प्रतिबिंब पाहून त्या व्यक्तीलादेखील हसू कोसळावे !

अर्थात व्यक्तीच्या ठायी वसणारे राग, लोभ आणि स्वाभिमान आदी विकार पाहता हे काम उरकणे किती कठीण आहे याची सहज कल्पना येईल ! अर्थात मराठी विनोदी साहित्यातील ही भूमिका बाळ गाडगीळ यांच्याइतकी इतर कोणत्याही विनोदी लेखकाने इतक्या यशस्वी रितीने वठविली असल्याचे दिसत नाही.

व्यक्तींप्रमाणेच काही अतिरिक्त वाङमयीन प्रवृत्तींवरही बाळ गाडगीळ यांनी चढाई केलेली आहे. ‘ पक्षी आणि दगड ’, ‘ ग्रामीण स्टुरी : योक अभ्यास ’ असे त्यांचे लेख जसे मर्मभेदक आहेत तेवढेच ते विनोदीही आहेत.

गाडगीळांचा विनोद सूक्ष्म असतो. तो बुद्धिनिष्ठ असतो. कित्येक वेळा तो शाब्दिक असतो हा जसा दोष आहे तसाच तो प्रासंगिक नसतो हा मोठा गुणही आहे. प्रत्येकाला हसविले पाहिजे हा जर अभिजात विनोदाचा दंडक असेल तर तसा अभिजात विनोद गाडगीळांचा नाही असेच म्हणावे लागेल. परंतु हा भंपकपणाचा दंडक आहे असे मला वाटते. पूर्वी नरसोपंत केळकर ललित साहित्याची व्याख्या करताना म्हणत असत की 'जे दिवाणखान्यापासून स्वैपाकघरापर्यंत सर्वांना वाचता येईल असे साहित्य श्रेष्ठ, परंतु अशी वाचनीयता आज श्रेष्ठ वाङमयाचे गमक होऊ


## जनतेचे प्रश्न आणि ललित साहित्य

कथानकाद्वारे साहित्यिकांनी समाज सुधारणा-राजकारणावरील आपली मते अनेकदा मांडली आहेत. मराठीत कै. प्रा. वा. म. जोशी यांनी 'इंदू काळे, सरला भोळे' मध्ये, तसेच हरिभाऊ आपटे, खांडेकर, वरेरकर यांनीहि असे प्रयत्न केलेले सुपरिचित आहेत. हे प्रयत्न सद्धेतुपूर्वक होते ! पण अपूर्ण ! त्यांचा प्रयत्न भारताचे प्रश्न सोडविण्याचा नव्हताच.

प्राथमिक अर्थ व शेती व्यवस्था, सामाजिक असमतोल, लोकसंख्या, अज्ञान, दारिद्रय हे भारतापुढील प्रश्न आहेत. या प्रश्नांना निराळे अस्तित्व नाही. जनतेचे सर्व जीवनशरीर, विचारसरणी, मते, मनोभूमि आणि हे प्रश्न यांचा एक Complex तयार झाला आहे; एक संयुग बनले आहे.

त्यांची उकल बाहेरून होणार नाही, ते आतून जनतेनेच सोडवावयास हवेत. जनता स्वतःच प्रयत्नपूर्वक लढाई देत यातून बाहेर आली पाहिजे.

जनतेच्या प्रयत्नाना बाहेरून साद मिळेल; ते वाया जाणार नाहीत असे वातावरण देता येईल. जनतेला प्रयत्नाभिमुख करता येईल. पण प्रत्यक्ष लढाई जनतेनेच लढली पाहिजे. राज्यकर्त्यांना फक्त हत्यारे पुरविता येतील.

त्यासाठी राज्यकर्त्यांकडे हवे जनताभिमुख नियोजन, तत्वग्राही विचार-सरणी आणि निर्भीडपणे तर्काच्या शेवटापर्यंत पोहोचण्याची हिंमत !

आणि ही अपेक्षाहि आज प्रश्नाच्या स्वरूपातच उभी आहे.

भारताच्या या प्रश्नास अनुलक्षून केलेला चर्चात्मक कथा लेखनाचा मराठीतील पहिलाच प्रयत्न नुकताच प्रकाशित झाला आहे. तो म्हणजे

**'अशी राणी अशी कहाणी'**

**[ लेखक–प्रकाशक–डॉ. ज. बा. मोकाशी, ठाणे; पान ३२०**
**किंमत रुपये १२–५० वितरक–मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.]**

शकत नाही. तीच गोष्ट विनोदी वाङमयाच्या बाबतीतही खरी आहे. आपला विनोद आपल्या वाचकांना हसवितो तो विनोद श्रेष्ठ. ना. सी. फडके यांचा जसा वाचक आहे, तसाच चिं. त्र्यं. खानोलकर यांचाही वाचक आहे. तसेच अत्रे यांचा जसा वाचक आहे तसाच बाळ गाडगीळ यांचाही वाचक आहे. त्या वाचकाला बाळ गाडगीळ यांचा विनोद प्रिय आहे. ◻

## ◻ विज्ञान युग

विज्ञानासंबंधीचे कुतुहल वाचकात वाढते आहे. विज्ञानकथा – Scientific fiction – हे आता मराठी वाङमयात स्वतंत्र दालन होऊ पहात आहे. विज्ञान-कथांचे लेखक म्हणून श्री. गजानन क्षीरसागर हे नाव कथाप्रेमी वाचकांना परि-चितही आहे. विज्ञान विषयावरचे हे मराठी नियतकालिक आता त्यांच्या संपादना-खाली सुरू झाले आहे. सर्व विज्ञानप्रेमी वाचक याचे स्वागत करतील यात शंका नाही.


प्रा. रा. वि. सोहनी, प्रा. ना. वा. कोगेकर, प्रा. भालबा केळकर, विद्याधर सहस्रबुद्धे इत्यादींचे या पहिल्याच अंकातील साहित्य, ज्ञान व मनोरंजन यांचा लाभ देणारे आहे. अंकाची छपाई अतिशय आल्हाददायक आहे.

विज्ञान प्रसाराचा हेतू पुढे ठेवून सुरू झालेल्या या सार–संग्राहक (Digest) मासिकाची वाटचाल यशस्वी होण्यासाठी, विज्ञानप्रेमी वाचक, विद्यालयीन व महा-विद्यालयीन विद्यार्थी यांनी हे 'विज्ञान युग' जवळ करणे अगत्याचे आहे.

अनिरुद्ध प्रकाशनाचे हे नियतकालिक अनिरूद्ध राहो, अशी शुभेच्छा आम्ही व्यक्त करतो. ◻

**हसायचं नाही !**
**लेखक – बाळ गाडगीळ**
**संजय प्रकाशन, पुणे**
**मूल्य : पाच रुपये.**

**विज्ञान युग – सप्टेंबर १९६८**
**वर्ष पहिले, अंक पहिला**
**संपादक : गजानन क्षीरसागर**
**मूल्य : सव्वा रुपया.**







# याला जीवन ऐसे नाव

जीवन जगायला काय लागत नाही ? सर्व काही लागते. पण जीवनात पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पाण्याचे दुसरे नाव जीवन. पाण्याबरोबरच इतरत्र द्रव पदार्थांचे जीवनात कमी महत्त्व नाही.

पाण्याने सर्व चराचर सृष्टी व्यापली आहे. पाणी कोठे लागत नाही ? घरगुती उपयोगासाठी व पिण्यासाठी हरघडी पाणी लागते; शेती व उद्योगधंद्यांत तर अव्याहत पाण्याचा पुरवठा लागतो. तेव्हा त्यासाठी पाण्याची वाहतूक करावी लागते. काही विशिष्ट उद्योग धंद्यांत पाण्याप्रमाणेच रासायनिक द्रव्यांचीही वाहतूक करावी लागते. तसेच आरोग्य रक्षणासाठी पावसाचे पाणी अथवा सांडपाणी याचाही सतत निचरा करावा लागतो. पण ही कामे बिनबोभाट पार पाडण्याचे काम पंपाकडून केले जाते.



किर्लोस्कर पंपाकडून ही कामे अधिक जलद व विनासायास पार पाडता येतात.

: सविस्तर माहितीसाठी लिहा :

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड,** उद्योग भवन, टिळक रोड, पुणे ९.

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## ऑक्टोबर महिन्याचे राशी-भविष्य

**मेष** : गुरू–मंगळाची बैठक हवी तशी आहे, रवि–शुक्रही तुमच्या प्रयत्नाला साथ देत आहेत. साडेसातीबद्दल आता मुळीच डरायचे कारण नाही. प्रयत्नांचे स्वरूप ज्या मानाने असेल त्या मानाने आपण यशाचा वाटा उचलू शकाल. या महिन्यात अनेकांच्या भेटीगाठी घ्याव्या लागतील, नवे कार्यक्रम यशस्वी करून दाखवावे लागतील, जबाबदारीचे ओझे खूप वाढेल.

ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात अपेक्षेप्रमाणे सारे काही घडावे. मुख्यतः २४ ला बुध मार्गी होताच आपली कामे वेग घेऊ लागतील.

दि. ३ ते ५, ११ ते १५, २२ ते २५ या कालात आपल्या योजना आकार घेऊ लागतील.

**वृषभ** : चौथ्या मंगळाची डोकेदुखी इतक्यातच थांबेल असे दिसत नाही. नाही म्हणावयास शनीचे सहकार्य आपणास थोडे फार लाभावे. तुमची धावपळ–धडपड अगदीच वाया जाणार नाही एवढेच.


कौटुंबिक कटकटी, स्थावराच्या भानगडी, व्यावहारिक मतभेद यांना अगदी ऊत येईल. पैशाअडक्याचा प्रश्न तर रात्रंदिवस छळत राहील. या वेळी सामाजिक क्षेत्रात, राजकीय प्रांतात न जाणे इष्ट ठरेल. नेहमीचे जुने तंत्र सोडून नव्या तंत्र-मंत्राचा अविष्कार करावा असे वाटू लागेल.

वेळेला थोरांचे सहाय्य लाभेल, नोकरीधंद्यातील पेचप्रसंग सुटण्याची लक्षणे दिसायला लागतील.

दि. १ ते ६, १३ ते १९, २२ ते २६ थोडेफार यश या वेळी पदरी पडावे.

**मिथुन** : गुरुसमवेत मंगळही पराक्रमात ही ग्रहस्थिती तुम्हाला कशाचीही ददात भासू देणार नाही. शनी–राहू फारसे अनुकूल नसले तरी मंगळाच्या निर्धाराने त्यांच्यावर आपण मात करू शकाल.







मुलीचे लग्न, मुलाचे शिक्षण
किंवा स्वत:चे घर यापैकी कोणतीही
समस्या असो; तिचे सोपे उत्तर म्हणजे
**संचित मुदतीच्या ठेवीचे खाते.**

१. टपाल कचेरीत दरमहा ठराविक रकमेची (पाचाने विभाज्य) रु. ५०० पर्यंत, ५, १०, अथवा १५ वर्षे ठेव ठेवीत चला, तुम्हाला पाहिजे असलेली ठोक रक्कम त्यापासून मिळेल (ठेवी व करमुक्त व्याज मिळून).

२. १० व १५ वर्षे मुदतीच्या खात्यांतील ठेवी कर आकारणी करताना एकूण करपात्र उत्पन्नातून वजा केल्या जातात.

३. ह्या ठेवींवर सक्तीकरही माफ असतो.

# समस्या सुटली...

संचित
मुदतीच्या
ठेवीचे खाते

आजच नजीकच्या टपाल कचेरीत उघडा

राष्ट्रीय
बचत
संघटना

DAVP 68/259

१२ ऑक्टोबरला गुरूचे राश्यंतर घडून येईल. तो चौथा गुरूही तुमच्या प्रगतीच्या आड सहसा येऊ शकणार नाही.

या महिन्यात जवळपासचे प्रवास सतत करावे लागतील. स्थानांतर – स्थित्यंतरही घडू शकेल. नव्या घरी राहण्यास जाण्याचे योग येतील.

खर्चाचे मान खूप वाढले तरी प्राप्तीही थोडीफार सुधारेल. साहित्य, ग्रंथप्रकाशन, यांत्रिक व्यव्हार यांमध्ये बरीच उलाढाल होऊ लागेल.

दि. २ ते ५, ९ ते १३ व १९ ते २३ विशेष अनुकूल काल.

**कर्क** : मंगळ तुमच्या राशीतून पसार झाला आणि सूर्य पराक्रमात आला या ग्रहस्थितीचा तुमच्या व्यवसायधंद्यावर निश्चितच अनुकूल परिणाम दिसू लागेल. शेती, स्थावर या बाबतीत तर अधिकाधिक चांगला काल हाच, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये.

पहिल्या पंधरवड्यात आपणास अनंत कामे हातावेगळी करावी लागतील. नव्या योजनांची आखणी करावी लागेल. १२ सप्टेंबरला गुरूचे राश्यंतर घडताच कर्तृत्वाचे एक निराळेच दालन तुमच्यासाठी उघडले जाईल.

अखेरचा आठवडा तर अनेक प्रगत घटनांनी भरलेला जाणवेल.

दि. ५ ते ११, १६ ते २१ व २४ ते २८ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**सिंह** : शनी पुनश्च अष्टमात येत आहे. त्यामुळे थोडाफार शारीरिक–मानसिक ताण जाणवेलही. पण गुरूची कृपा लाभलेल्या माणसाने अशा बारिक सारिक अनिष्टतेची दखल घेण्याचे मुळीच कारण नाही.

हा महिना आपणास नवे क्षेत्र मिळवून देईल, अनेकांच्या सहकार्याचा लाभ घडवून आणील. ६ ऑक्टोबरचे चंद्रग्रहण होऊन जाताच आपल्या कर्तृत्वाला दाही दिशा मोकळ्या दिसू लागतील. सामाजिक व राजकीय क्षेत्रात हिरीरीने भाग घ्याल, आणि त्यामुळे आपल्या प्रतिष्ठेची उंची वाढू लागेल. साहित्य–वृत्तपत्रीय लेखन याकडे अधिक लक्ष लागेल.

दि. ७ ते ११, १७ ते २२ व २४ ते ३० अपेक्षा साफल्याचे दिवस.

**कन्या** : मंगळ व्ययात आणि सूर्य राशीमध्येच-या उग्र व प्रखर ग्रहांचा ताण होऊ असह्य लागेल. सांपत्तिक अडचणी उत्तरोत्तर वाढू लागतील. सप्तमातील वक्री शनीमुळे नोकरीधंद्यात व सांसारिक जीवनात पदोपदी खटकू लागेल. भागीदारीत वितुष्ट वाढू लागेल, सांसारिक वातावरण कलुषित झाल्यासारखे जाणवायला लागेल.

तात्पर्य हे दिवस आपणास अपेक्षित यशाचे दिवस नाहीत.

शत्रू याच वेळी उठाव घ्यायला लागतील, इष्टमित्र सहकार्य करीनासे होतील.

पण १२ सप्टेंबरला गुरूसारखा विशाल तेजोगोल आपल्या राशीत येणार असल्यामुळे आपल्या प्रतिष्ठेला यत्किंचितही धक्का लागणार नाही.

दि. १० ते १३ व १९ ते २५ हा काल अपेक्षित लाभाचा जाणवेल.

**तूळ :** आजवर आपणास अकरावा गुरू होता. आता १२ सप्टेंबरपासून त्याचे सहकार्य आपणांस पूर्वीप्रमाणे लाभेलच अशी आशा करायला जागा नाही.

पण त्यामुळे तुमचे गाडे अगदीच घसरेल असे समजायचे काही कारण नाही. सारे व्यवहार जपून व सावधपणे केलेत की, हे अनिष्ट ग्रहही सहसा तुमच्या वाटेस जाऊ शकणार नाहीत.

या वेळच्या रवि-शनी प्रतियोगाच्या आसपासचा काल काहीसा विशेष जपून काढा.

आपण आपले सारे कर्तृत्व पणाला लावून कार्यक्षेत्रात उतरलात तर आपणास अपयशाची भीतीच नको.

दि. ३ ते ९, १३ ते १९, २२ ते २६ आपल्या अपेक्षा काही प्रमाणात सफल व्हाव्यात.

**वृश्चिक** : वृश्चिक व्यक्ती आधीच प्रयत्नवादी—परमेश्वर कुठे असेल तर तो माझ्या मनगटात आहे, अशी आपली निष्ठा. अशा समर्थ व्यक्तींच्या वाट्याला अकरावा गुरू येत असल्यामुळे, आपल्या अपेक्षा सफल करणारा काल हाच असे म्हणायला मुळीच हरकत नाही.

सध्याही काही ग्रह लाभस्थानी आहेत. लवकरच आणखीही येणार आहेत.

यांत्रिक उद्योगधंद्यात तुमचा स्वैरसंचार सुरू होऊ लागेल. उद्योगधंद्याचे नवे क्षेत्र हाती येईल. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. तुमच्या जीवनात जे अनेक चांगले कालखंड आहेत त्यापैकी हा एक.

दि. ७ ते ११, १७ ते २४, २८ ते ३० या काळी अनेक अपेक्षा सफल व्हाव्यात.

**धनू** : तुमचा अनिष्ट काल बराचसा ओसरलेला आहे. शनी पुन्हा चौथा येणार आहे म्हणून काळजी करू नका. गुरू भाग्यात आहे. दशमातही त्याचे आगमन घडणार आहे.

तो सहसा तुम्हाला कशातही उणे पडू देणार नाही. दुसऱ्या पंधरवड्यात लाभस्थानी सूर्य येताच आपल्या साऱ्या स्थगित कार्यांना गती मिळू लागेल. न होणारी कामे भराभर हातावेगळी होऊ लागतील. या वर्षाची दिवाळी आपण चांगलीच गाजवून सोडाल.

थोडेफार जपावे लागेल प्रकृतीला. अतिशय परिश्रम करणेही मानवणार नाही.

# शिलंगणाचे सोने

**ब. मो. पुरंदरे**

**आवृत्ती समाप्त**

फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलण्याच्या फंदात पडू नका.

दि. ८ ते १४, १७ ते २३, २६ ते ३० विशेष यश देणारा काल.

**मकर** : गुरू भाग्यस्थानी प्रवेश करताच, तुमच्या अनिष्ट कालावर पडदा पडेल १२ वर्षांनंतर लाभणारा हा एक पर्वकाल आहे. शिवाय सूर्य, हर्षल वगैरे अनेक ग्रहांचे भाग्यस्थानातून संचलन सुरू झालेले आहे.

आपल्या जीवनात अनेक चिरंतन स्मृतीच्या प्रगत घटना भराभर घडून यायला लागतील. नोकरीधंद्यात एक पाऊल पुढे पडेल, मंगल कार्याचे निश्चित ठरेल. दैविक कृपेचा पदोपदी प्रत्यय यायला लागेल.

ऑक्टोबरचा दुसरा पंधरवडा अनंत प्रगत घटनांनी भरलेला जाणवेल. या वर्षाची दिवाळी आपल्यास कित्येक वर्षांत अनुभवण्यास मिळाली नसेल इतकी आनंदात जाईल.

दि. ४ ते ९, १४ ते २०, २६ ते ३० अपेक्षा पूर्णत्वाने सफल होतील.

**कुंभ** : काही काल तर पुन्हा साडेसाती आपणास अनुभवावी लागणार आहे. मंगळही याच वेळी अनिष्ट आहे. आता प्रत्येक गोष्टीत जपून पाऊल टाकायला हवे.

पण व्यवहारधंद्यात नोकरीचाकरीत काही अनिष्ट प्रकार घडणार नाहीत. जबाबदारी वाढेल, कामाचा ताण खूप पडेल आणि त्या मानाने यशाचा वाटा फारसा पदरी पडणार नाही.

या काली फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलण्याच्या भानगडीत पडू नका. प्रत्येक गोष्ट जपून सावधपणे, विचाराने करायला हवी. वादविवादापासून चार हात दूरच रहा.

या काळात दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा. मंगलकार्याचे पुढे ढकला.

दि. ७ ते १३, २३ ते २९ हे दिवस थोडेफार यशदायी ठरावेत.

**मीन** : वक्री गतीने शनीने पुन्हा तुमच्या राशीत पाऊल टाकलेले आहे. मार्चपर्यंत तरी तो तेथून हाललेलसे दिसत नाही. मंगळ सध्या ठीक असला तरी या महिन्याच्या अखेरीला तो सप्तमात येणार आहे.

ही ग्रहस्थिती काहीशी तणातणीची, कटकटीची जाणवेल.

मुख्यत: प्रकृती आणि मन:स्थिती ठीक राहणार नाही. सांपत्तिक ताण, राहत्या घरांच्या कटकटी, व्यावहारिक पेचप्रसंग अशा प्रकारांनाही मधून मधून तोंड द्यावे लागेल.

१५ ऑक्टोबरचा रवि-शनी प्रतियोग मतभेद विरोधाचे प्रसंग वाढवील. दूरच्या प्रवासाचे टाळा.

दि. १ ते ३, १४ ते २०, २६ ते २८ थोडेफार अनुकूल दिवस. ○

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**

[ कव्हर २ वरून ]

या बदलांचे, विस्तारलेल्या कक्षांचे दर्शन घडविणारी पत्रे... अगदी वैयक्तिक...जिव्हाळ्याची...भारावलेल्या मन:स्थितीत लिहिलेली...उत्साह ज्यात ओसंडून वाहत आहे अशी...

**– माणूस दिवाळी अंक**

सतरा ते सत्तेचाळीस वयातील सर्वांना या विलोभनीय व्यक्तिमत्त्व असलेल्या पत्रलेखकाची-राजूची-राजेन्द्र पटवर्धनची– ओळखच करून घ्यावीशी वाटेल.

माणूस दिवाळी अंकाविषयी आणखी काही....

☐ लेनिन क्रांतीतील हिरवळ आणि होरपळ–
सुप्रसिद्ध रा. म. शास्त्री (वि. ग. कानिटकर) यांनी रंगवलेली राजघराण्यातील एका पुण्यशील पतिव्रतेची दुर्दैवी अखेर... चटका लावणारी एक दीर्घकथा.

☐ अशी जगते आहे आजची सौ. उषा खेर–
कालची हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीतील एक ख्यातनाम, प्रथमश्रेणीची अभिनयनिपुण आणि प्रसन्नवदना अभिनेत्री उषाकिरण—विजय तेंडुलकर.

सुमारे अडीचशे पृष्ठांचा कसदार आणि रंगदार अंक

किंमत रुपये तीन :

सजावट : श्याम जोशी, माळकर, सरवटे, सहस्रबुद्धे.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. MH–649


चार चांदण्या खुडून घेते गुंफिन राया गजरा
राया मला खांद्यावर घ्या जरा !



पुरंदरच्या फत्तेबुरुजावर अशी धुंद लावणी रंगली होती. वेळ सांजेची होती. वादळ सुटलं होतं. आभाळात काळे ढग धिंगाणा घालीत होते. मधूनच चांदण्या लुकलुकत होत्या. तटावरची नांदुरखी वादळाने करकरा लवत होती. पानं सळसळत होती. चंद्रावळ भान विसरून नाचत होती. बुरुजावरच्या तोफेला रेलून चंदरराव उभा होता. केसाच्या बटा उडत होत्या.

अन् धो धो पाऊस बरसू लागला. लावणी चिंब भिजली.

**बाबासाहेब पुरंदरे**
**यांची धुंद कथा**

'माणूस' दिवाळी अंक